cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

• छत्रपती संभाजीनगर • पुणे • अहिल्यानगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१०४ | शनिवार दि.०४ जुलै २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### श्रद्धा की फक्त मते?

भारतातील धार्मिक स्थळांचे ''आधुनिकीकरण'', कॉरिडॉर प्रकल्प, आणि देवस्थान व्यवस्थापनातील वाढत्या आर्थिक उलाढाली यामुळे श्रद्धा आणि प्रशासन यांच्यातील सीमारेषा दिवसेंदिवस धूसर होत चालली आहे. मंदिरांच्या नावावर सुरू असलेल्या भव्य प्रकल्पांमागे पारदर्शकता किती आहे, हा प्रश्न आता केवळ राजकीय नाही तर सार्वजनिक हिताचा गंभीर मुद्दा बनला आहे.

# बनावट खतांवर धडक मोहीम; दोषी निरीक्षकांवर फौजदारी कारवाईचा इशारा

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यात निकृष्ट व बनावट कृषी निविष्ठांच्या विक्रीला आळा घालण्यासाठी कृषी विभागाने विशेष तपासणी मोहीम अधिक तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. या मोहिमेत कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नसल्याचा स्पष्ट इशारा कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दिला आहे. विशेष म्हणजे, तपासणीत कसूर करणाऱ्या तालुकास्तरीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांवर प्रशासकीय कारवाईबरोबरच आवश्यकतेनुसार फौजदारी गुन्हे दाखल करण्याचाही इशारा देण्यात आला आहे.**

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळणे आणि त्यांच्या हिताचे संरक्षण करणे हा या विशेष मोहिमेचा मुख्य उद्देश असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. अद्यापही राज्यातील काही भागांत निकृष्ट दर्जाची खते, बियाणे आणि इतर कृषी निविष्ठांची विक्री होत असल्याच्या तक्रारी सातत्याने प्राप्त होत असल्याने तपासणी अधिक कठोर करण्यात आली आहे. नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार तालुकापातळीवरील कृषी अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील कृषी निविष्ठा विक्री केंद्रांची दररोज प्रत्यक्ष तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संशयास्पद वाटणाऱ्या खते, बियाणे व इतर निविष्ठांचे नमुने तातडीने घेऊन ते प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत. तालुका निरीक्षकांच्या कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी विभागीय स्तरावर भरारी पथके नियुक्त करण्यात आली असून ही पथके अचानक फेरतपासणी करून तपासणीच्या गुणवत्तेचे मूल्यमापन करणार आहेत. या फेरतपासणीत संबंधित




निरीक्षक दोषी आढळल्यास किंवा त्यांनी कामात हलगर्जीपणा केल्याचे स्पष्ट झाल्यास त्यांच्यावर तात्काळ प्रशासकीय कारवाई केली जाणार आहे. याशिवाय, ज्या तालुक्यांमध्ये वारंवार बनावट किंवा निकृष्ट कृषी निविष्ठांची विक्री होत असल्याचे आढळेल, त्या तालुक्यातील गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांना थेट जबाबदार धरले जाणार आहे. अशा प्रकरणांमध्ये संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध प्रशासकीय कारवाईबरोबरच फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे प्रस्तावही सादर केले जाणार आहेत. ▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### लाडक्या बहिणींना मिळणार जूनचा हप्ता

मुंबईः राज्य सरकारच्या 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना'तील लाभार्थी महिलांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. जुलै महिन्याचा पहिला आठवडा सुरू झाला असला तरी जून महिन्याचा १५,०० रुपयांचा हप्ता अद्याप लाभार्थी महिलांच्या खात्यात जमा झालेला नाही. त्यामुळे राज्यातील लाखो महिलांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, जून महिन्याचा थकीत हप्ता येत्या १५ जुलैपर्यंत लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. याबाबत सरकारकडून अद्याप अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसली, तरी ही माहिती समोर आल्याने महिलांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, या योजनेअंतर्गत साधारणपणे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आसपास लाभार्थींच्या खात्यात १,५०० रुपयांचा हप्ता जमा केला जातो.

### साकीनाका दुर्घटनेवरून विधानसभेत गदारोळ

मुंबई : मुंबईतील अंधेरीतील साकीनाका परिसरात उघड्या मॅनहोलमध्ये पडून एका व्यक्तीचा झालेल्या दुःखद मृत्यूची घटनेने विधानसभेत गदारोळ झाला. सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या सदस्यांनी या घटनेला गंभीर शासकीय निष्काळजीपणाचा बळी म्हटले असून, जबाबदार अधिकारी आणि कंत्राटदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनीही महानगरपालिकेला या संदर्भात स्पष्ट उत्तर देण्याचे निर्देश दिले. भाजपा आमदार अमित साटम म्हणाले की, मुंबईसारख्या महानगरात उघड्या मॅनहोलमुळे नागरिकाचा मृत्यू होणे ही एक अत्यंत गंभीर आणि लाजिरवाणी घटना आहे. या घटनेत सामील असलेले कंत्राटदार, अभियंता आणि जबाबदार अधिकाऱ्यांना जबाबदार धरले पाहिजे आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई केली पाहिजे अशी मागणी केली.

# पैठण तहसीलमध्ये महिला शेतकऱ्याचा गळफास घेण्याचा प्रयत्न



पैठण । प्रतिनिधी

**शेतीच्या सातबारावर चुकीच्या व्यक्तीच्या नावाने झालेला फेरफार रद्द करण्याच्या मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या महिला शेतकऱ्याने शुक्रवारी (दि.३) पुन्हा एकदा आक्रमक आंदोलन केले. तहसील कार्यालयाच्या भिंतीवर चढून विद्युत खांबाला साडी बांधत गळफास घेण्याचा प्रयत्न केल्याने तहसील कार्यालय परिसरात एकच खळबळ उडाली.**

पैठण तालुक्यातील ढोरकीन येथील शेतकरी शोभा बबन कुदळे यांच्या शेतीच्या सातबारावर चुकीच्या व्यक्तीचा फेर झाल्याचा आरोप असून, तो रद्द करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा महसूल प्रशासनाकडे पाठपुरावा केला आहे. मात्र, अद्यापही त्यांच्या मागणीवर कार्यवाही न झाल्याने त्यांनी पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. यापूर्वी सुमारे महिनाभरापूर्वीही शोभा कुदळे यांनी तहसील कार्यालय परिसरातील पाण्याच्या टाकीवर चढून शोले चित्रपटातील शैलीत आंदोलन केले होते. त्यावेळी पोलिसांनी समजूत काढून त्यांना सुरक्षित खाली उतरविले होते. शुक्रवारी दुपारच्या सुमारास तहसील कार्यालयात नागरिकांची मोठी गर्दी असताना शोभा कुदळे यांनी तहसीलदार कार्यालयासमोरील भिंतीवर चढून विद्युत खांबाला साडी बांधत गळफास घेण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार निदर्शनास येताच तहसील कार्यालयात एकच धावपळ उडाली. घटनेची माहिती मिळताच पैठण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक महादेव ▶▶ पान २ वर

# दारूपेक्षा 'स्टिंग' घातक; शाळा परिसरात बंदी



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील शाळकरी मुलांमध्ये लोकप्रिय होत असलेल्या स्टिंग एनर्जी ड्रिंकवर अखेर राज्य सरकारने कठोर भूमिका घेतली आहे. पावसाळी अधिवेशनात या विषयावर जोरदार चर्चा झाल्यानंतर शाळांच्या ५०० मीटर परिसरात स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या विक्रीवर बंदी घालण्याचे निर्देश शुक्रवारी देण्यात आले आहेत. श्रीगोंदा-नगरचे भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी विधानसभेत हा मुद्दा उपस्थित करत स्टिंग एनर्जी ड्रिंकच्या दुष्परिणामांकडे सरकारचे लक्ष वेधले. विशेष म्हणजे, या पेयाच्या बाटलीवरच लहान मुले आणि गर्भवती महिलांसाठी ▶▶ पान २ वर

### तुकाराम मुंढेंची विधानभवनात उपस्थिती

स्टिंग एनर्जी ड्रिंकवरील चर्चेदरम्यान अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंढे विधानभवनात उपस्थित होते. गेल्या काही आठवड्यांपासून अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आस्थापनांवर त्यांनी सुरू केलेल्या धडक कारवायांमुळे ते चर्चेत आहेत. मुंढे यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरात प्रतिबंधित गुटखा, पानमसाला, निकृष्ट अन्नपदार्थ आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या हॉटेल्स, रेस्टॉरंट्सवर सातत्याने कारवाई केली जात आहे.

### आता, उत्पादनावर एनर्जी ड्रिंकं लिहायचे नाही–तुकाराम मुंढे

बाजारात जे काही सोल कॉल्ड एनर्जी डिंक्स म्हणून येतात, या सो कॉल्ड एनर्जी ड्रिंक्सच्या कंपन्यांना एनर्जी ड्रिंक्स हा शब्द लिहता येत नाही, ३० जून रोजी याबाबत त्यांना नोटीस काढण्यात आल्या आहेत. १०-१२ कंपन्या आहेत, पेप्सिको, रेड बुल, स्टिंगसारख्या ज्या कंपन्या आहेत, त्यांना नियमावलीनुसार संबंधित कंपन्यांना तो शब्द लिहता येत नाही. त्यामुळे, संबंधित कंपन्यांना एनर्जी ड्रिंक असं आपल्या उत्पादनावर लिहता येणार नाही हे नोटीसमध्ये बजावले आहे. त्यामुळे, आता ते बंद होईल, असे तुकाराम मुंढेंनी स्पष्टपणे सांगितले.

# पुढील ४ दिवस राज्यात मुसळधार पाऊस

## हवामान विभागाचा सतर्क राहण्याचा इशारा



पुणे । प्रतिनिधी

राज्यातील काही भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. तर काही भागात अद्याप म्हणावा तसा पाऊस झालेला नाही. मुंबईसह कोकणात आणि विदर्भातील काही भागात चांगला पाऊस कोसळत आहे. दरम्यान, अशातच हवामान विभागाने महत्वाची माहिती दिली आहे. महाराष्ट्रात आणखी चार दिवस पावसाचा जोर वाढणार असल्याची माहिती हवामान विभागाने दिली आहे.

हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, कोकण आणि घाटमाथ्यावर अनेक ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात विजांच्या कडकडाटासह मध्यम ते ▶▶ पान २ वर

# राम मंदिर घोटाळ्या वरूनउद्धव ठाकरेंचा भाजपवर हल्लाबोल; राम रक्षा आंदोलनाची मोठी घोषणा

मुंबई । प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राम मंदिराच्या देणगी निधीच्या कथित गैरव्यवहाराच्या मुद्यावर भाजपवर जोरदार हल्लाबोल केला आहे. अयोध्येतील राम मंदिरासाठी भाविकांनी दिलेल्या देणगीच्या वापराबाबत प्रश्न उपस्थित करत त्यांनी राम रक्षा आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली. या आंदोलनाची सुरुवात रविवार, ५ जुलै रोजी सायंकाळी ४ वाजता दादर येथील मारुती मंदिराजवळ होणार असल्याचे त्यांनी सांगितले.



पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले की, राम मंदिर हा केवळ धार्मिक विषय नसून लाखो हिंदूंच्या श्रद्धेचा प्रश्न आहे. या श्रद्धेशी कुणीही खेळ करू नये. राम मंदिरासाठी जमा झालेल्या निधीबाबत ▶▶ पान २ वर

# अॅट्रॉसिटी कायद्यात दोषसिद्धीचे प्रमाण वाढवा–मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी

अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक अर्थात 'अॅट्रॉसिटी' कायद्याअंतर्गत दाखल गुन्ह्यांमध्ये दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधान भवन येथे अनुसूचित जाती, जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम अंमलबजावणीसाठी गठीत राज्यस्तरीय दक्षता व संनियंत्रण समितीच्या बैठकीत दिले.

या कायद्यासारख्या विशेष कायद्यामध्ये सरकारी वकिलांमार्फत दोषसिद्धी वाढविण्यासाठी करण्यात आलेल्या कार्याचा उल्लेख त्यांच्या मूल्यमापनात करण्याचे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. बैठकीस खासदार हेमंत सवरा यांच्यासह समितीमधील आमदार उपस्थित होते. भारतीय न्याय संहितेमध्ये कुठल्याही खटल्यात दोन वेळा तडजोड किंवा समायोजन करण्याची ▶▶ पान २ वर

### केतन अग्रवाल हत्याकांडात : चेतन-सियाची पोलीस कोठडीसह नार्को चाचणीही फेटाळली!

पुणे । प्रतिनिधी


बहुचर्चित केतन अग्रवाल हत्याकांडात शुक्रवारी अत्यंत महत्त्वाची घडामोड घडली आहे. लोहगड किल्ल्यावर फिरण्यासाठी गेलेल्या केतन अग्रवाल यांच्या हत्येप्रकरणी अटक करण्यात आलेली मुख्य आरोपी सिया गोयल आणि तिचा साथीदार चेतन चौधरी या दोघांनाही न्यायालयाने १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. या हाय-प्रोफाईल प्रकरणाकडे आता संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

मुख्य आरोपी सिया गोयल हिची कडेकोट पोलीस बंदोबस्तात ▶▶ पान २ वर

# देणगी पेटीतील चोरीची घटना हिंदू समाजाच्या श्रद्धेला धक्का–आरएसएस

नागपूर । प्रतिनिधी

अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणगी चोरीच्या प्रकरणावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने प्रथमच अधिकृत भूमिका मांडली आहे. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे यांनी निवेदन जारी करत या घटनेमुळे देशभरातील रामभक्तांच्या भावना दुखावल्या असल्याचे म्हटले आहे. तसेच या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणीही त्यांनी केली आहे. दत्तात्रेय होसबळे यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात ▶▶ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,

बीड, दि.०३ जुलै २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत


| शेतमाल | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ११८.०० क्विंटल | २,४९४ | २,५२१ | २,५०४ |
| ज्वारी/हायब्रिड: ५१.०० क्विंटल | १,८२१ | ३,९९१ | २,७०२ |
| मका/लोकल: ४०.५० क्विंटल | २,२०० | २,२५६ | २,२२८ |
| तूर : ६.५० क्विंटल | ५,००० | ७,३०० | ६,५०० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |
| बाजरी: ८०.५० क्विंटल | २,४०० | ३,३०१ | २,६६२ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| हरभरा: ६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५५२ | ५,५२६ |

# तुकाराम मुंढेंच्या निशाण्यावर आता दूध सम्राट

## राज्यात सेव्ह फूड सेव्ह ड्रग मोहीम, फार्म टू प्लेटसाठी नियमावली जारी

मुंबई । प्रतिनिधी

**राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढेंच्या कारवाईचा धडाका सुरुच असून, गेल्याच आठवड्यात त्यांनी हॉटेल व्यवसायिकंसाठी नियमावली सादर करत कारवाईला सुरुवात केली होती. तत्पूर्वी पनीर विक्रेते, बेकरी व्यवसायिकांनाही आपल्या कामाचा धाक दाखवत भेसळयुक्तांवर कारवाईचा बडगा उगारला होता. आता, दूध सम्राटांकडे त्यांनी आपली नजर वळवली असून, तुकाराम मुंढेंकडून दूध वक्रेत्यांवर स्ट्राईक केला जात आहे. त्याच अनुषंगाने नियमावली सादर करण्यात आली असून, सेव्ह फुड, सेव्ह ड्रग ही मोहिम हाती घेण्यात आली आहे. ग्राहकांच्या ताटात दूध, दुग्धजन्य पदार्थ पोहोचण्यापर्यंतचे निर्बंध स्पष्ट नमूद करण्यात आले आहेत.**



शुक्रवारी घेतलेल्या पत्रकार परिषदेत राज्यात सेव्ह फूड सेव्ह ड्रग ही मोहीम आता आपण हाती घेतली आहे, आपल्या अन्नात सगळ्यात महत्वाचा घटक असतो तो म्हणजे दूध. दूध उत्पादकांची बैठक मी घेतली होती, त्यांना प्रेझेंटेशन दाखवले असून दूध प्रोडक्ट इकोसिस्टम असली पाहिजे. फार्म टू प्लेट प्रोसिजर आपल्याला बघावी लागेल, असे तुकाराम मुंढेंनी म्हटले. दुधातली भेसळ, कृत्रिम दूध या सगळ्या संबंधी गाईडलाइन्स दिल्या आहेत. त्यासंदर्भातील आदेश आपण दिले आहेत, दूध उत्पादकांना पॅकर्सपासून सेलर पर्यत ८ प्रकारचे नियम सगळ्यांना लागू आहेत, अशी माहितीही तुकाराम मुंढेंनी पत्रकार परिषदेत दिली. दूध संलनन केंद्र, दूध कुलिंग सेंटर, किरकोळ विक्रेते, बल्क दूध विक्री करणारे, पनीर, खवा, लोणी, क्रीम, चीज, आयस्क्रीम विक्रेते या सगळ्यांना हे नियम लागू असतील, असेही मुंढेंनी म्हटले. हॉटेल व्यवसायिकांसाठी आपण सुरू केलेल्या मोहिमेत असंही आढळून आले की, अनेकांनी नियमानुसार बदल केले आहेत. मात्र, काही हॉटेल, रेस्टॉरंटमध्ये पेस्ट कंट्रोल केले असे सर्टिफिकेट दाखवतात. मात्र, प्रत्यक्षात पेस्ट कंट्रोल काही हॉटेलमध्ये केले नव्हते, त्यांचे लायसन्स रद्द करण्याचे काम आम्ही केले आहे. त्यामुळे, मला फक्त सर्टिफिकेट नको आहेत, ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# श्रद्धा की फक्त मते?

भारतातील धार्मिक स्थळांचे ''आधुनिकीकरण'', कॉरिडॉर प्रकल्प, आणि देवस्थान व्यवस्थापनातील वाढत्या आर्थिक उलाढाली यामुळे श्रद्धा आणि प्रशासन यांच्यातील सीमारेषा दिवसेंदिवस धूसर होत चालली आहे. मंदिरांच्या नावावर सुरू असलेल्या भव्य प्रकल्पांमागे पारदर्शकता किती आहे, हा प्रश्न आता केवळ राजकीय नाही तर सार्वजनिक हिताचा गंभीर मुद्दा बनला आहे.

ऑक्टोबर २०२२ मध्ये उज्जैन येथील सुमारे ८५० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या महाकाल लोक कॉरिडॉरचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात झाले. मात्र अवघ्या सात महिन्यांत, मे २०२३ मध्ये सप्तर्षींच्या मूर्ती वादळी वाऱ्याने कोसळल्या. नंतर समोर आलेल्या अहवालांनुसार या संरचनांमध्ये वापरलेले साहित्य, विशेषतः (फायबर रिइनफोर्स्ड प्लास्टिक), आणि कंत्राटदारांच्या कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. ही घटना केवळ तांत्रिक अपयश नव्हे, तर सार्वजनिक निधीच्या वापरातील उत्तरदायित्वाच्या अभावाचे उदाहरण ठरली. त्याच काळात केदारनाथ मंदिरातील २३० किलो सोन्याच्या वापराबाबत उठलेल्या वादानेही धार्मिक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. १२५ कोटी रुपयांच्या खर्चाने सोन्याचे पितळात रूपांतर झाल्याचा आरोप समोर आला, ज्यावर मंदिर समित्यांनी स्पष्टीकरण दिले असले तरी पारदर्शकतेचा मुद्दा कायम राहिला. अयोध्येतील राम मंदिर प्रकल्पात जमीन व्यवहारांवर आलेल्या आरोपांनीही लक्ष वेधले. काही व्यवहारांमध्ये काही मिनिटांतच मूल्यवाढ झाल्याचे आरोप समोर आले, ज्यामुळे धार्मिक प्रकल्पांतील आर्थिक व्यवहारांवर देखरेख किती प्रभावी आहे, हा प्रश्न उपस्थित झाला. तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळयुक्त तूप व प्राणिजन्य घटक आढळल्याचा दावा करणाऱ्या अहवालांनी देशभर संताप निर्माण केला. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये तपास यंत्रणांची प्रतिक्रिया आणि वेळेत कारवाई न होणे, हेही तितकेच गंभीर मानले जाते. काशी विश्वनाथ धाम कॉरिडॉर प्रकल्पाने वाराणसीच्या परिसराचा कायापालट केला, परंतु त्याच वेळी काही प्राचीन संरचनांच्या नाशाचे आरोपही झाले. ओडिशातील पुरी जगन्नाथ मंदिर परिसरातील विकास कामे आणि 'रत्न भांडार'च्या चाव्यांचा मुद्दा यामुळे मंदिर व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले. चारधाम रस्ता प्रकल्पामुळे पर्यटन आणि तीर्थयात्रा सुलभ झाली असली तरी पर्यावरणीय परिणाम, भूस्खलन आणि जोशीमठसारख्या शहरांतील संकटांनी विकासाच्या मॉडेलवर प्रश्नचिन्ह उभे केले. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधण्यात प्रशासन कमी पडल्याचे आरोप सातत्याने होत आहेत. गुजरातमधील अंबाजी मंदिरातील प्रसाद बदल आणि भेसळीच्या आरोपांनी तर स्थानिक स्तरावरील व्यवस्थापनातील त्रुटी समोर आणल्या. या सर्व घटनांचा एकत्रित विचार केला तर प्रश्न केवळ एका प्रकल्पाचा किंवा एका राज्याचा राहत नाही. तो अधिक व्यापक आहेधार्मिक श्रद्धेचा वापर राजकीय प्रभाव, आर्थिक व्यवहार आणि जनमत घडवण्यासाठी केला जातो का? धार्मिक स्थळांचे आधुनिकीकरण आवश्यक आहे, परंतु त्याचबरोबर पारदर्शकता, वैज्ञानिक देखरेख, स्वतंत्र ऑडिट आणि सार्वजनिक उत्तरदायित्वही तितकेच आवश्यक आहे. अन्यथा श्रद्धा ही केवळ भावनात्मक भांडवल बनते आणि त्यावर आधारित निर्णय लोकशाहीतील मतांमध्ये रूपांतरित होतात. आजचा मुख्य प्रश्न हाच आहेश्रद्धा ही सेवा आणि शुद्धतेसाठी आहे, की ती फक्त निवडणुकीतील मतांपर्यंत मर्यादित राहिली आहे?

# माजलगावात २५० विद्यार्थ्यांना मोफत नोटबुकचे वाटप




**माजलगाव । प्रतिनिधी**

**सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पैजणे यांच्या पुढाकारातून माजलगाव शहरातील नवीन मोंढा जिल्हा परिषद शाळा व भीमनगर जिल्हा परिषद शाळा येथे एकूण २५० विद्यार्थ्यांना मोफत नोटबुकचे वाटप करण्यात आले.**

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेनेचे माजी नगरसेवक मा. अशोक नाना कीर्तन हे होते. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित अभ्यास, शिस्त आणि परिश्रम यांच्या बळावर जीवनात यश संपादन करण्याचे आवाहन केले.कार्यक्रमास सामाजिक कार्यकर्ते गोपाळ पैजणे, भारत डोंगरे, नितीन कांबळे, विजय जोगडे आणि अशोक अर्जुन यांची प्रमुख उपस्थिती होती.या उपक्रमामागील उद्देश समाजातील प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षणासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून देणे आणि आर्थिक अडचणींमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये हा आहे. उपस्थित मान्यवरांनी अशा सामाजिक उपक्रमांचे स्वागत करत भविष्यातही अशा उपक्रमांना सातत्याने पाठबळ देण्याचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, कर्मचारी, पालक तसेच सहकार्य करणाऱ्या सर्व हितचिंतकांचे आयोजकांनी आभार मानले.

# वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते माता अहिल्याबाई होळकर चौकादरम्यान गतिरोधक बसवा

## अन्यथा ठाकरेसेनेची स्टाईल दाखवू भैय्या खोसे यांचा इशारा

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते साळींबा रोडवरील माता अहिल्याबाई होळकर चौका दरम्यान प्रचंड वाहनांची व पदाचारी नागरिकांची वर्दळ असून या ठिकाणी तात्काळ गतिरोधक बसवावेत अन्यथा संबंधित प्रशासनाला ठाकरेसेनेची स्टाईल दाखवू असा इशारा युवा सेनेचे शहर प्रमुख भैया खोसे यांनी दिला आहे. या मागणीचे वडवणी तहसीलदारांना लेखी निवेदन दिले आहे.**



या संदर्भाचे लेखी निवेदन युवा सेनेचे वडवणी शहर प्रमुख भैया खोसे यांनी तहसीलदार यांना निवेदन दिले आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की, वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक ते माता अहिल्याबाई होळकर चौक हा रस्ता नुकताच बांधकाम विभागाने नव्याने केला आहे तर या मार्गावर जवळपास २५ ते ३० खेड्यांचा रोजचा ये-जा करण्याचा मार्ग आहे. त्यामुळे या मार्गावर प्रचंड वाहतूक असते. तसेच या मार्गावर छत्रपती राजश्री शाहू महाराज व ज्ञानसाधना इंग्लिश स्कूल या दोन शाळा असून विद्यार्थ्यांची देखील या मार्गावर वर्दळ दिसून येते, तसेच नुकताच हा रस्ता सार्वजनिक बांधकाम विभागाने केला असून या रस्त्यावरून वाहने भरधाव वेगाने धावतात व येतात यामुळे येथील पायी नागरिकांना याचा त्रास होत असून भविष्यात मोठ्या अपघाताची शक्यता आहे. हा अपघात टाळण्यासाठी या मार्गावर किमान तीन ठिकाणी तरी गतिरोधक बसवण्यात यावे. तसेच ही मागणी नागरिकांच्या हिताची असून मी साहेबांनी गांभीर्यपूर्वक लक्षात घेऊन पूर्ण करावी. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल याची दक्षता घ्यावी. असा इशारा वडवणी शहराचे युवा ठाकरेसेनेचे शहर प्रमुख भैया खोसे यांनी यांनी इशारा दिला आहे. याबाबत वडवणी तहसीलदार यांना लेखी निवेदन देखील दिली आहे. सदरील प्रश्न तात्काळ मार्गे न लावल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन देखील छेडण्याच्या इशारा दिला आहे. यावेळी युवा सेनेचे तालुकाप्रमुख नवनाथ मोरे, युवा सेनेचे अजय खांडवे, विजय वाघमारे, यांच्यासह आदी जण उपस्थित होते.

# वेलतूर येथील भिल्ल आदिवासी कुटुंबियांचे चौथ्या दिवशीही आष्टी तहसील समोर उपोषण सुरूच

**आष्टी । प्रतिनिधी**

**आष्टी तालुक्यातील वेलतूर येथील भिल्ल आदिवासी कुटुंबाला विष्णू पाईप्स कंपनी व प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याने २९ जुलै २०२६ रोजी पासून सर्व कुटुंबासह आष्टी तहसील कार्यालयासमोर बेमुदत उपोषणा ला बसले आहेत. तीन दिवस ऊलटूनही कोणी दखल घेतली नाही.आजचा चौथा दिवस आहे. या संदर्भातील निवेदन तहसीलदार आष्टी यांना सादर केले होते परंतु त्याचा काही उपयोग झाला नाही.या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, पोलीस अधीक्षक बीड व अंभोरा पोलीस स्टेशन यांनाही पाठवण्यात आल्या होत्या.**





याबाबत सविस्तर वृत्त असे की, वेलतूरी येथील भिल्ल आदिवासी कुटुंबीय मागील ३-४ वर्षांपासून वेलतूरी येथील गट नं. ८६ मधील संबंधित कंपनीच्या जागेमध्ये वास्तव्यास आहेत. या विष्णू पाईप्स कंपनीच्या कामादरम्यान सदर कुटुंबाच्या राहत्या झोपड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विनापरवाना बेकायदेशीर मुख्य रस्ता बंद करण्यात आला आहे.यामुळे या कुटुंबाचे उपजिविकेचे गंभीर साधन हिरावले गेले आहे.प्रशासनाकडून कारवाईत टाळाटाळ या जाचाविरुद्ध व अन्यायाविरुद्ध पीडित कुटुंबाने यापूर्वी दि.१९ जुन २०२५ रोजी सविस्तर व सचित्र पुराव्यांसह प्रशासनाकडे निवेदन दिले होते. मात्र,आजतागायत कोणतीही ठोस चौकशी अथवा कारवाई झाली नसल्याचे निवेदनात म्हटले आहे. उलटपक्षी,खोटे गुन्हे दाखल करण्याची धमकावणी,तसेच जीवे मारण्याची धमकी व पोलीस बळाचा वापर करण्याची भीती संबंधित घटकांकडून दाखवली जात असल्याचा गंभीर आरोप कुटुंबाने केला आहे. वारंवार मागणी करूनही प्रशासनाकडून योग्य न्याय मिळत नसल्याने, पीडित आदिवासी कुटुंबाने आता आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने स्थळ पाहणी करून संबंधित दोषींवर कायदेशीर कारवाई करावी,भिल्ल आदिवासी कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा अशी मागणी केली आहे. आंदोलना दरम्यान काही जीवित वा अनपेक्षित हानी झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कंपनी व प्रशासनाची राहील, असा इशारा उपोषणकर्त्या छबुबाई मस्तान गायकवाड व भिल्ल आदिवासी कुटुंबाने दिला आहे.

# गणेश बजगुडे यांची काँग्रेसच्या बीड तालुका अध्यक्ष पदी तिसऱ्यांदा फेरनिवड

**बीड । प्रतिनिधी**

काँग्रेस पक्षाचे नेते भावी पंतप्रधान राहुलजी गांधी यांच्या संकल्पनेतून संघटन सृजन अभियानाच्या माध्यमातून देशभरात पदाधिकाऱ्यांच्या निवड प्रक्रिया पुढील कार्यकाळासाठी पक्ष संघटन अधिक मजबुत करत राहुलजी गांधी व काँग्रेस पक्षाचे विचार व कार्य तळागाळापर्यंत पोहचवण्यासाठी खऱ्या काम करणाऱ्या कार्यकर्त्याला संधी देण्याचे काम या संघटन सृजन अभियानाच्या माध्यमातून करण्यात आले. या निवड प्रक्रियेसाठी बीड जिल्ह्यात निरीक्षक म्हणून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीच्या वतीने नीतू वर्मा मॅडम (दिल्ली) यांच्यासह महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे एम एम शेख, सुरेंद्र गोडजकर, विद्याताई पाटील यांनी निरीक्षक म्हणून काम पाहिले. निरीक्षकांनी दिलेल्या प्रत्यक्ष अहवालातून काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या माध्यमातून व



काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या माजी खासदार रजनीताई पाटील व माजी मंत्री अशोकराव पाटील यांच्या नेतृत्वात बीड तालुका काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी गणेश बजगुडे पाटील यांची निवड करण्यात आली असुन काल युवा नेते आदित्य पाटील व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी बोलताना गणेश बजगुडे पाटील म्हणाले की, मी मागील अनेक वर्षांपासुन बीड तालुका व मतदार संघात पुर्ण वेळ काम करत असुन माझे काम लोकांशी जोडलेली नाळ व पक्ष आणि नेत्या प्रती असलेली निष्ठा यामुळे मला आज तिसऱ्यांदा काँग्रेसच्या बीड तालुकाध्यक्षपदी काम करण्याची संधी मिळालेली आहे. मी पुढील काळात देखील आमच्या नेत्या माजी खासदार रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील, युवा नेते आदित्य पाटील व जिल्हाध्यक्ष राहुल सोनवणे यांच्या नेतृत्वात पक्ष संघटन अधिक मजबुत करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करेल त्याच बरोबर माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी कधीही तडा जाऊ देणार नाही असे ही ते म्हणाले. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रवीणकुमार शेप, बीड शहराध्यक्ष इलियास टेलर, इंटक जिल्हाध्यक्ष रामधन जमले, असंघटित कामगार काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष संतोष निकाळजे, शिरूर तालुकाध्यक्ष भास्कर केदार, आष्टी तालुकाध्यक्ष शेख फारुक, पाटोदा तालुकाध्यक्ष राहुल जाधव, माजलगाव तालुकाध्यक्ष महावीर मस्के, युवक काँग्रेसचे हनुमान घोडके, विद्यार्थी काँग्रेसचे शेख मुशर्रफ, शिवाजी कोटुळे, मिलिंद मस्के, शेख मोहसिन, शेख जाहीर, योगेश बहिरवाल, योगेश कुंभारकर, पिनु डांगे, शिवाजी घुमरे, शेख अर्शद, शेख सोफियान आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## पान १ वरून...

### बनावट खतांवर धडक मोहीम; दोषी

दरम्यान, कृषी विभागाने १ एप्रिल ते २९ जून २०२६ या कालावधीत राज्यभर विशेष गुणवत्ता नियंत्रण मोहीम राबविली. या मोहिमेत आतापर्यंत बनावट कृषी निविष्ठांप्रकरणी १०४ एफआयआर दाखल करण्यात आले असून ५.३२ कोटी रुपयांचा बनावट खतांचा साठा जप्त करण्यात आल्याची माहिती विभागाने दिली आहे.

----------

### दारूपेक्षा 'स्टिंग' घातक; शाळा

हे पेय योग्य नसल्याचा इशारा दिलेला आहे. त्यामुळे अशा पेयांची विक्री शाळकरी मुलांना होऊ नये. त्यांनी तर दारूपेक्षाही स्टिंग एनर्जी ड्रिंक अधिक घातक आहे असा दावा सभागृहात केला. यावर अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवळ यांनी शाळांच्या परिसरात स्टिंगची विक्री करण्यास बंदी घालण्याचे जाहीर केले.

--------------

### पैठण तहसीलमध्ये महिला

गोमारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक वैभव सारंग तसेच पोलीस कर्मचारी तांबे, गायकवाड, पाटेकर आणि लक्ष्मण पुरी यांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आणि महसूल अधिकाऱ्यांनी संयमाने समजूत घालत काही तासांच्या प्रयत्नानंतर महिलेला गळफासाचा प्रयत्न थांबवून सुरक्षितपणे खाली उतरविले यानंतर नायब तहसीलदार राहुल बनसोडे यांनी संबंधित प्रकरणात पुढील आवश्यक कार्यवाही करण्याबाबत लेखी आश्वासन दिल्यानंतर परिस्थिती निवळली.

-----------

### ॲट्रॉसिटी कायद्यात दोषसिद्धीचे

तरतूद असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातही या तरतुदींवर आधारित कायद्यात सुधारणा करण्यासंदर्भातील प्रस्ताव सादर करावा. विशेष कायद्यांमध्ये दोन वेळा समायोजनाचीच तरतूद असावी. जेणेकरून अशा गुन्ह्यांमध्ये आरोपी सुटणार नाहीत. राज्यातील ज्या जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटीचे गुन्हे जास्त आहेत, त्या ठिकाणी जलदगती न्यायालय उभारावीत. या न्यायालयांच्या माध्यमातून खटल्यांच्या निकालांना गती मिळेल. त्यामुळे पीडितांना गुन्हा दाखल झाल्यापासून कमी कालावधीत न्याय मिळणार असल्याचा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. गृह विभागाच्या मार्वल संस्थेच्या माध्यमातून ॲट्रॉसिटी गुन्ह्यांमधील दोषसिद्धी न होण्याची कारणे शोधून गुन्हा दाखल झाल्यापासून ते न्यायालयामध्ये खटला दाखल करेपर्यंत विशिष्ट कार्य पद्धती तयार करण्यात यावी. यामध्ये तकलादू पुरावे, चेन ऑफ इव्हेंट, साक्षीदार फितूर होणे या बाबींचा अभ्यास करून ही विशिष्ट कार्यपद्धती असावी. या कायद्याअंतर्गत तपास अधिकारी हा उपविभागीय पोलीस अधिकारी असतो. त्यामुळे राज्यभरात घेण्यात येणाऱ्या कार्यशाळांमध्ये प्रकर्षाने उपविभागीय पोलीस अधिकारी स्तरावर प्रशिक्षण घेण्यात यावीत. या कायद्याअंतर्गत दाखल खटल्यांच्या न्यायालयीन सुनावणीची भारतीय न्यायसंहितेमधील तरतुदीनुसार व्हिडिओ चित्रीकरण करावे, जेणेकरून साक्षीदार फितूर होण्याचे प्रमाण कमी होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

----------

### राम मंदिर घोटाळ्या वरून उद्धव ठाकरेंचा भाजपवर

गंभीर प्रश्न उपस्थित होत असताना सत्य जनतेसमोर आले पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली. भाजपवर टीका करताना उद्धव ठाकरे म्हणाले, एकेकाळी अटलबिहारी वाजपेयी यांनी अब हिंदू मार नहीं खाएगा असे म्हटले होते. आज मी एवढेच म्हणेन की, अब हिंदू माफ नहीं करेगा. रामाच्या नावाने राजकारण करणाऱ्यांनी आता जनतेला उत्तर द्यावे लागेल. दरम्यान, राम मंदिर निधीबाबतचे आरोप, त्यावरील चौकशी आणि उद्धव ठाकरे यांनी केलेले आरोप यावर संबंधित यंत्रणा किंवा भाजपकडून अधिकृत प्रतिक्रिया येणे बाकी आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे राज्याच्या राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. राम मंदिरासाठी जमा झालेल्या पैशांचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत उद्धव ठाकरे यांनी भाजपवर निशाणा साधला. राम मंदिराच्या नावावर लोकांनी श्रद्धेने देणग्या दिल्या. मात्र आता या निधीबाबत संशय निर्माण झाला आहे. काही माध्यमांमध्ये आलेल्या वृत्तांनुसार या पैशांचा वापर राजकीय हेतूंसाठी, पक्ष फोडण्यासाठी किंवा सत्तेचे राजकारण करण्यासाठी होत असल्याच्या चर्चा आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची चौकशी व्हायला हवी असे ते म्हणाले. राम मंदिर आंदोलनात शिवसैनिकांनीही मोठा सहभाग घेतल्याची आठवण करून देताना ठाकरे म्हणाले की, त्या काळात अनेक हिंदूंनी संघर्ष केला होता. त्या भावनांचा वापर करून भाजपने राजकीय फायदा घेतला आणि आज त्याच राम मंदिराच्या नावावर प्रश्न निर्माण झाले आहेत, असा आरोप त्यांनी केला. राम मंदिर निधीबाबत सत्य बाहेर यावे आणि जबाबदारांवर कारवाई व्हावी, या मागणीसाठी राज्यभरातील रामभक्तांनी रविवारी दादरमधील मारुती मंदिराजवळ एकत्र यावे, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी केले. या आंदोलनाला राम रक्षा आंदोलन असे नाव देण्यात आले असून, रामभक्तांच्या श्रद्धेचे संरक्षण करण्यासाठी हा लढा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

---------

### पुढील ४ दिवस राज्यात

जोरदार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विदर्भातही काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. महाराष्ट्र ते कर्नाटक किनारपट्टीदरम्यान ऑफ-शोअर ट्रफ सक्रिय आहे. वायव्य बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. ते पुढील दोन दिवसांत अधिक प्रभावी होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर नदीकाठ, डोंगराळ भाग आणि सखल परिसरातील नागरिकांनी सतर्क राहावे असे आवाहन देखील हवामान विभागाच्या वतीने करण्यात आले आहे. स्थानिक प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे आणि अनावश्यक प्रवास टाळावा असे आवाहन करण्यात आलें आहे.

-------------

### केतन अग्रवाल हत्याकांडात : चेतन-सियाची

कान्हे फाटा येथील जिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली. त्यानंतर कायदेशीर प्रक्रियेसाठी तिला वडगाव मावळ पोलीस ठाण्यात नेऊन न्यायालयात हजर करण्यात आले. सुनावणीदरम्यान, या गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी पोलिसांनी सिया गोयल आणि चेतन चौधरी या दोन्ही आरोपींच्या आणखी ३ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. तसेच आरोपींची नार्को चाचणी करण्याची परवानगीही न्यायालयाकडे मागितली होती. मात्र, न्यायालयाने पोलिसांची पोलीस कोठडीची मागणी फेटाळून लावली. तसेच नार्को चाचणीसाठी आरोपींची संमती नसल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने पोलिसांची ही मागणीही अमान्य केली आणि दोघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. बचाव पक्षाचे वकील विपुल दुशिंग यांनी न्यायालयात युक्तिवाद करताना सांगितले की, पोलिसांकडे अतिरिक्त कोठडी मागण्यासाठी कोणताही नवीन किंवा ठोस आधार नव्हता. डेटा रिकव्हरी आणि कथित तिसऱ्या व्यक्तीच्या सहभागाबाबत पोलिसांनी केवळ जुनेच मुद्दे न्यायालयासमोर मांडले, परंतु त्याबाबत कोणताही नवीन पुरावा सादर करू शकले नाहीत. तसेच, अद्याप आरोपींच्या वतीने जामिनासाठी कोणताही अर्ज दाखल करण्यात आलेला नाही, अशी माहितीही त्यांनी दिली. दुसरीकडे, पोलिसांनी या हाय-प्रोफाईल प्रकरणाचा तपास योग्य दिशेने सुरू असून, तांत्रिक पुराव्यांसह सर्व बाजूंचा सखोल तपास केला जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

--------------

### देणगी पेटीतील चोरीची घटना हिंदू

म्हटले आहे की, श्रीराम जन्मभूमीवरील भव्य मंदिर हे अनेक पिढ्यांच्या संघर्ष, त्याग आणि कोट्यवधी रामभक्तांच्या श्रद्धेचे प्रतीक आहे. त्यामुळे मंदिरातील देणगीपेटीतील पैशांच्या कथित चोरीची घटना अत्यंत दुर्दैवी असून, यामुळे संपूर्ण हिंदू समाजाच्या श्रद्धेला धक्का बसला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत उत्तर प्रदेश सरकारने विशेष तपास पथक स्थापन केले आहे. तपासात जे कोणी दोषी आढळतील, त्यांच्यावर कठोर कारवाई झाली पाहिजे, असेही होसबळे यांनी स्पष्ट केले. संघाने आपल्या निवेदनात मंदिर व्यवस्थापनालाही काही महत्त्वाच्या सूचना केल्या आहेत. मंदिराच्या आर्थिक व्यवहारात पूर्ण पारदर्शकता असावी, व्यवस्थापनातील त्रुटी तातडीने दूर कराव्यात आणि भविष्यात अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, याची खात्री करावी, अशी अपेक्षा संघाने व्यक्त केली आहे. सध्या या प्रकरणामुळे भाविकांमध्ये अनेक प्रश्न आणि संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे मंदिर प्रशासन आणि विशेष तपास पथकाने संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य लवकरात लवकर जनतेसमोर आणावे, असेही संघाने म्हटले आहे. दरम्यान, राम मंदिरातील देणगीपेटीतील पैशांच्या कथित अपहारप्रकरणी आतापर्यंत आठ जणांना अटक करण्यात आली आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टचे महासचिव चंपत राय यांचे चालक टिन्नू यादव तसेच मंदिरातील देणगी मोजण्याच्या प्रक्रियेशी संबंधित काही कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

-----------

### तुकाराम मुंढेंच्या निशाण्यावर

काम न केल्यास थेट लायसन्स रद्द केले जातील, अशा इशाराच तुकाराम मुंढेंनी दिला आहे. महाराष्ट्र शासनाने दूध व दुग्धजन्य पदार्थाच्या संपूर्ण पुरवठा साखळीत अन्न सुरक्षा व गुणवत्ता मानकांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी राज्यव्यापी सर्वकष अनुपालन आदेश जारी केला आहे. हा आदेश दूध संकलन शीतकरण प्रक्रिया, पॅकेजिंग, साठवणूक, वाहतूक वितरण आणि विक्री या सर्व टप्प्यावर लागू असेल, व्यवसाय, चालकासाठी बंधनकारक आहे, असे तुकाराम मुंढेंनी म्हटले. आदेशाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण वाढ करणे, प्रामाणिक दुध व्यवसायांना प्रोत्साहन देणे आणि राज्यात आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे हा आहे. राज्यभर करण्यात आलेल्या तपासण्या, निरीक्षण, नमुना विश्लेषणे अंमलबजावणी कारवाईतून दूध पुरवठा साखळीच्या विविध टप्प्यावर काही गंभीर त्रुटी सातत्याने निदर्शनास आल्या. या त्रुटी केवळ जिल्ह्यापूत्या नाही संपूर्ण पुरवठा साखळीमध्ये एकसमान अनुपालन व्यवस्था आवश्यक आहे, असेही मुंढेंनी म्हटले.

---------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार, दि. ०४ जुलै २०२६
३




## मोठेवाडी येथील युवक विलास कदम यांचा सन्मान!

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील मोठेवाडी येथील युवक विलास अशोक कदम यांची भारतीय सैनिक दलामध्ये देशसेवेसाठी निवड झाली आहे. या अभिमानास्पद कामगिरीबद्दल दि.०२ जूलै गुरुवार रोजी गवात फटाक्यांच्या आतिषबाजीत ग्रामस्थांनी विलास कदम यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन सन्मान केला. सत्कार समारंभात विलास कदम यांनी गावातील युवकांना मार्गदर्शन केले. अनुशासन, प्रामाणिकपणा आणि समर्पणाच्या जोरावर ध्येयप्राप्तीसाठी सातत्याने मेहनत करावी. अपयशाला खचून न जाता सातत्याने अभ्यास करावा तसेच राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असा संदेश त्यांनी दिला. आपल्या यशाचे संपूर्ण श्रेय आई-वडील, गुरुजन आणि ग्रामस्थांचे सहकार्य व आशीर्वादाला देत विलास यांनी सर्वांचे आभार मानले. मोठेवाडी गावातील सुपुत्राची भारतीय सैन्यात निवड झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण असून गावकऱ्यांमध्ये अभिमानाची भावना जागृत झाली आहे. यावेळी माजी सरपंच अविनाश गोंडे,दत्तात्रय चव्हाण,उपसरपंच अंगदराव खेत्री, पत्रकार राजाभाऊ पास्टे,ॲड. पांडुरंग गोंडे, सुदर्शन हिवरकर,दत्तात्रय तपसे,भिमराव पास्टे,रामेश्वर चव्हाण,बालाजी रेडे,बाळु जंवदळे,दिनकर पास्टे,मदन गोंगाने,अशोक कदम,दादा पास्टे, आदित्य गोंडे,वसंत पास्टे,श्रीकांत पास्टे,बाबा नावडकर,बंडू साठे, यांच्यासह ग्रामस्थांची मोठी उपस्थिती होती.

## वसंतराव नाईकांनी राज्यात हरितक्रांती घडवली -राजेंद्र आमटे



बीड । प्रतिनिधी

सर्वसामान्य शेतकऱ्याच्या घरामध्ये जन्म घेणाऱ्या वसंतराव नाईक साहेबांनी महाराष्ट्रात हरितक्रांती घडविण्याचे काम केले, असे प्रतिपादन शेतकरी हक्क मोर्च्याचे राजेंद्र आमटे यांनी केले.

पुढे बोलताना आमटे म्हणाले की, पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचे काम वसंतराव नाईक यांनी केले. हरितक्रांतीचे नव्हे तर शेतक्रांती व सर्वसामान्य मजुरांकरिता रोजगार हमी योजना आणली. महाराष्ट्रात हरितक्रांती, श्वेतक्रांती, रोजगार हमी, पंचायतराज यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सुखी करण्याचा प्रयत्न त्यांच्या काळात झाला. वसंतरावजी नाईक यांनी महाराष्ट्रामध्ये हरितक्रांती घडून आणली म्हणून च त्यांचा जन्मदिवस हा कृषी दिन म्हणून महाराष्ट्रात साजरा केला जातो. महाराष्ट्र कृषी दिनानिमित्त शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने वसंतराव नाईक यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी शेतकरी हक्का मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, रामधन जमाले, हनुमान घोडके, डॉ.शेंडगे, माऊली परसकर, दादा सपकाळ, कोठेकर बाबू, दिगंबर सपकाळ, दादा परसकर सह आदी उपस्थित होते.

# सुभाष रोडवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरूच जिल्हा वाहतूक शाखेच्या प्रयत्नांना बीडकरांचा प्रतिसाद

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी जिल्हा वाहतूक शाखेने सुरू केलेली अतिक्रमण हटाव मोहीम सातत्याने सुरू असून, गजबजलेल्या सुभाष रोडवरील अतिक्रमणे हटविण्याची कारवाई पुन्हा करण्यात आली. या मोहिमेमुळे शहरातील प्रमुख व्यापारी भाग असलेला सुभाष रोड आता मोकळा श्वास घेऊ लागल्याचे चित्र दिसत आहे.

सुभाष रोडवर वर्षभर नागरिकांची मोठी वर्दळ असते. विशेषतः दिवाळीसह विविध सण-उत्सव, खरेदीचा हंगाम आणि बाजाराच्या दिवशी येथे मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होते. अनेक वर्षांपासून या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची गरज व्यक्त होत होती. नुकतेच जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक म्हणून रुजू झालेले वैभव पाटील यांनी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी सकारात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी स्वतः सुभाष रोडवर उपस्थित राहून अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईचे नेतृत्व केले. रस्त्यावर अडथळा ठरणारी




अतिक्रमणे हटवून वाहतुकीसाठी जागा मोकळी करण्यात आली. या मोहिमेमुळे सुभाष रोडवरील वाहतूक अधिक सुरळीत होण्यास मदत होणार असून, नागरिक, वाहनचालक आणि व्यापाऱ्यांनाही दिलासा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.जिल्हा वाहतूक शाखेचे




पोलीस निरीक्षक वैभव पाटील व त्यांच्या पथकाकडून शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सातत्याने सुरू असलेल्या प्रयत्नांचे अनेक बीडकरांकडून स्वागत केले जात असून, ही मोहीम नियमितपणे सुरू ठेवावी, अशी अपेक्षाही नागरिक व्यक्त करत आहेत.

## वार्षिक कर आकारणी सर्व्हे चुकीचा झाल्यामुळे विशेष कर आकारणी रद्द करण्यात यावी - मंगलाताई मुंडे

वडवणी । प्रतीनिधी

नगरपंचायत वडवणी कडुन चतुर्थ वार्षिक कर आकारणीसाठी करण्यात आलेला असुन हा सर्व्हे सदरील कंपनी कडुन चुकीचा झालेला असल्यामुळे यामध्ये आनेक प्रकारच्या चुका झाल्याचे निदर्शनास येत असुन यानुसार विशेष कर आकारणी करण्यात येत असून यामुळे नागीरांमध्ये घबराहट निर्माण झालेली असुन असंतोष निर्माण झालेला असल्याने सदर कर आकारणी लागु करण्यात येऊ नये तसेच नव्याने कर आकारणी बाबतचा विषय सभेपुढे ठेवण्यात यावा आशी वडवणी न.प. च्या गटनेत्या मंगलाताई मुंडे यांनी नगाराध्यक्ष न.प. वडवणी यांचेकडे लेखी



निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदन म्हटले आहे की , नगर पंचायत वडवणी यांनी वार्षीक कर आकारणी सर्वे करण्यासाठी इंडीयन टेक्नो सर्व्हीस नागपुर यांची नियुक्ती करण्यात आलेली होती परंतु नगर पंचायत हद्दीतील सर्व्हे करतांना सदरिल कंपनीकडून चुकीचा सर्व्हे करण्यात आलेला असुन आनेक घरांचा घर नंबर, चतुरशिमा, तसेच आनेक ठिकाणी घराचे बांधकामाचे क्षेत्रफळ चुकीचे दर्शवण्यात आलेले असुन अतिक्रमण धारकास कर आकारणी करणे, एकाच मालमत्तेच्या आनेक मालमत्ता करणे इत्यादीमुळे मालमत्ता धारकास त्यांच्या मालमत्तांची ओळख पटत नाही तसेच घरांचे बांधकाम क्षेत्रफळ चुकीचे दर्शवण्यात आलेले आहे तसेच स्थावर मालमत्ता मालकास व भोगवटा धारकास करण्यात आलेली कर आकारणी ही ' अ ' वर्ग नगरपरिषद बीड,परळी, अंबेजोगाई यांच्या कितीतरी पटीने जास्त आहे त्याबाबतच्या नोटिसा घरमालक , भोगवटाधारकास देण्यात आलेल्या आहेत. वडवणी नगरपंचायत हद्दीतील महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत औद्योगीक नगरी अधिनियम १९६५चे कलम ११९ ( १)अन्वये नोटीसा दिल्यामुळे नागरिकांमध्ये घबराट निर्माण झाली आसुन असंतोष निर्माण झालेला असुन सदरिल सर्व्हेच चुकीचा झालेला असल्यामुळे सदर कर आकारणी लागु करण्यात येऊ नये आशी लेखी मागणी नगर पंचायत गटनेत्या व मा . नगराध्येक्षा न . प. वडवणी सौ . मंगलाताई मुंडे यांनी नगराध्यक्ष न .प. वडवणी यांचेकडे केली असुन नव्याने कर आकारणी करण्याबाबतचा विषय सभेपुढे ठेवण्यात यावा आशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## पान ६ वरुन...

### आठवडी बाजारासह शहरात

आणि पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

सामान्य नागरिकांच्या सुरक्षेसाठी नगरपंचायत प्रशासन आणि स्थानिक पोलीस प्रशासनाने तातडीने संयुक्त बैठक घेऊन शहरातील सीसीटीव्ही यंत्रणेचे जाळे विणणे गरजेचे आहे. विशेषतः आठवडी बाजाराच्या दिवशी पोलिसांचा कडक बंदोबस्त वाढवण्यासोबतच सीसीटीव्ही निगराणीची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी व्यापारी आणि स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

शहरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे हे दुर्दैवी आहे. आमची प्रशासनाला विनंती आहे की, सीसीटीव्ही कॅमेरे लावून आमचे शहर सुरक्षित करावे, जेणेकरून महिला आणि सामान्य नागरिक निर्भयपणे बाजारात येऊ शकतील.

- स्थानिक नागरिक

या संदर्भात प्रशासनाकडून काय पावले उचलली जातात, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### जिल्हा वाहतूक शाखासह

या बैठकीस सर्व शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, शाळा व्यवस्थापन प्रतिनिधी, शालेय वाहतूक व्यावसायिक तसेच संबंधित विभागातील अधिकारी यांनी आवर्जून उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने ही कार्यशाळा अत्यंत महत्त्वाची असल्याने सर्व संबंधितांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा वाहतूक शाखा, परिवहन विभाग (आरटीओ) रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेस तथा रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### अभ्यासासोबतच सामाजिक संस्कारही

ही मुलाची पहिली शाळा असते आणि शाळा ही दुसरी आई. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडविण्याची मोठी जबाबदारी पालकांसोबत शिक्षकांवर आहे. डॉक्टर्स डे निमित्त शाळेने डॉक्टरांचा सत्कार करण्याचा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे सांगत ते पुढे म्हणाले की, समाजाप्रती जबाबदारीने काम करणाऱ्या डॉक्टरांचे कार्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे व त्यांचा सन्मान करणे हा संस्कार या कार्यक्रमातून मिळाला. सकारात्मक पालकत्व व सकारात्मक शिक्षक हेच विद्यार्थ्यांचे जीवन घडवू शकतात. त्यामुळे पालक व शिक्षकांनी आपली जबाबदारी ओळखून काम करावे. विद्यार्थ्यांशी संवाद साधताना डॉ.इंगोले यांनी आवाहन केले की, आई-वडील आपल्यासाठी अहोरात्र कष्ट करतात. त्यांची अपूर्ण स्वप्ने पूर्ण करण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने कठोर मेहनत घ्यावी. केवळ ज्ञानी न होता संस्कारी व्हा. देशाप्रती, समाजाप्रती आपले कर्तव्य काय हे जाणणारा समाजच राष्ट्राला महासत्ता बनवतो. असे सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले.

### एसआयआर प्रक्रिया

देण्याची आवश्यकता नाही फक्त फॉर्मला एक फोटो लावून माहिती भरून द्यावा.लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाचे नाव मतदार यादीत असणे आवश्यक आहे त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपले नाव मतदार यादीत कायम ठेवण्यासाठी फॉर्म भरून घेणे गरजेचे आहे.नसता आपले नाव मतदार यादीत राहणार नाही व आपल्याला मतदान करण्यापासून तर वंचित रहावेच लागेल व पण त्यासोबतच अनेक शासकीय योजने पासून पण वंचित राहावे लागेल .

### खांबामधील विद्युत प्रवाहाने

मृत्यू पावला मात्र हा प्रकार सदरील शेतकऱ्यांच्या लक्षात येतात जवळ असलेले नागरिक वाचले असून एका बैलाला वाचवण्यात सदरील शेतकऱ्याला यश आले आहे. हा बैल मृत्यू पावल्यामुळे या शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून जवळपास एक लाख रुपये किमतीचा हा बैल मरण पावल्याने परिसरातील शेतकऱ्यांतून हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान महावितरणच्या चुकीमुळे थांबा मध्ये विद्युत प्रवाह उतरला असून सदरील विद्युत प्रवाहने बैलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे महावितरणने सदरील शेतकऱ्याला नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

### राजेंद्र मस्के यांचा वाढदिवस

केलेल्या पाठपुराव्याचे विशेष कौतुक केले. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी असून आगामी काळातही त्यांच्या नेतृत्वाखाली जनसेवेचे कार्य अधिक बळकट होईल, अशा भावना अनेकांनी व्यक्त केल्या. राजेंद्रजी मस्के यांच्या राशी निवासस्थानी सकाळपासूनच शुभेच्छुकांची रिघ लागली होती. यावेळी रायगड गुड मॉर्निंग ग्रुपचे सदस्य, राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे तालुकाप्रमुख, विविध आघाड्यांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, मित्रपरिवार व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसानिमित्त आयोजित अल्पोपहाराचा उपस्थितांनी लाभ घेतला. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण, आनंदी व आपुलकीच्या वातावरणात पार पडला. उपस्थितांच्या शुभेच्छा, प्रेम आणि सहकार्यामुळे समाजसेवेचा हा प्रवास अधिक बळकट होत राहो, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. राशी निवासस्थानी पुढील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेटून राजेंद्रजी मस्के यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या :

## महासांगवीच्या चैत्राली सानप ठरल्या 'महाराष्ट्राची महा सरपंच'

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील महासांगवी गावाने आज राज्यभरात आपल्या कार्याचा ठसा उमटवत एक नवा इतिहास रचला आहे. मुंबईत पार पडलेल्या महा सरपंच २०२६' या भव्य राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात महासांगवीच्या सरपंच चैत्राली सानप यांना 'महाराष्ट्राची महा सरपंच' या अत्यंत मानाच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. राज्याच्या उपमुख्यमंत्री मा. सुनेत्राताई पवार यांच्या हस्ते हा गौरव करण्यात आला.**




१४ पैकी अव्वल स्थान

महाराष्ट्रभरातील हजारो ग्रामपंचायतींमधून निवड झालेल्या १४ आदर्श सरपंचांच्या यादीत महासांगवीने बाजी मारली. गावातील रोजगार निर्मिती, लोकसहभागातून राबवलेले स्वच्छता अभियान आणि गावातील प्रत्येक घरापर्यंत वीज व शुद्ध पाण्याची सोय, या तीन मुख्य आघाड्यांवर केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमुळे महासांगवीने राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.

सत्कार सोहळ्यात उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी महासांगवीच्या पुढील विकासासाठी ५० लाख रुपयांचा विशेष निधी जाहीर केला. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, चैत्राली सानप यांच्यासारखे तरुण नेतृत्व आज महाराष्ट्र घडवत आहे. महासांगवी गावाने विकासाचे जे मॉडेल उभे केले आहे, ते संपूर्ण राज्यासाठी एक प्रेरणादायी आदर्श आहे. या सोहळ्यास राज्याचे ग्रामविकास मंत्री मा. जयकुमार गोरे, माजी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, मंत्री योगेश कदम, भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते सरपंच चैत्राली सानप यांना सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## प्रियदर्शनी प्राथमिक शाळेत स्व.वसंतराव नाईक यांची जयंती, कृषी दिन कार्यक्रम साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात असणाऱ्या प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये दि. १ जुलै २०२६ रोजी हरित क्रांतीचे जनक महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक जयंती व कृषी दिन कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष मु.अ. मोरे सर होते तर प्रमुख पाहुणे म्हणून पाटोदा पोस्ट ऑफिस कार्यालय प्रमुख मा.श्री. पवळ साहेब, शा.व्य.समितीचे मा.श्रीकांत लांडगे ,सह पालक उपस्थित होते सर्वप्रथम अध्यक्ष,प्रमुख पाहुणे यांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आल त्यानंतर कार्यक्रम सूत्रसंचालन श्री माताडे सर यांनी केले तर श्रीमती वीर मॅडम व मदतनीस श्रीमती गायके मॅडम यांच्या नियोजनातून या कार्यक्रमांमध्ये शाळेतील इ.१ली ते इ.४ थी तील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.




प्रमुख पाहुण्याच्या मनोगतामध्ये माजी मुख्यमंत्री स्वर्गीय वसंतराव नाईक यांच्या जीवन चरित्राचा अभ्यास विद्यार्थ्यांनी करावा असे व्यक्त केले तर आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये मोरे सर यांनी व्यक्त केले कि महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये वसंतराव नाईक यांचे अनमोल योगदान शेतीच्या नवीन नवीन धोरणाची अंमलबजावणी त्यांच्या कार्यकाळात करण्यात आले शेती पिकली तर शेतकरी टिकेट असा अनमोल मंत्र दिला अशा या महामानवाचे विचार डोक्यात घेऊन मानवाने शेती, शिक्षण याकडे लक्ष दयावे. शिक्षणाचा उपयोग शेतीसाठी केला तरच तुमची प्रगती होईल असे मत व्यक्त केले.जयंती विचारांनी साजरी व्हावी असा हेतू व्यक्त केला कार्यक्रमाच्या शेवटी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला . कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक शिक्षिका कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## शासकीय कामात अडथळा व मारहाण केल्याप्रकरणी आरोपीस शिक्षा

बीड । प्रतिनिधी

फिर्यादीस उप जिल्हा रुग्णालय, गेवराई येथे उपजिल्हा रुग्णालयात रुग्णास उपचार करीत असताना मारहाण करून शासकीय कामात अडथळा केल्या प्रकरणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश ४ थे बीड मा. एस. एस. घोरपडे साहेब, यांनी आरोपी राहुल अदिनाथ बांगर यास कलम ३५३,३३२,५०६ भा.द.वि तसेच कलम ४ महाराष्ट्र वैद्यकीय सेवा-व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा-संस्था (हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांस प्रतिबंध) अधिनियम, २०१० अन्वये दोषी ठरवुन तीन वर्ष सश्रम कारावास व प्रत्येकी ८०००/- रूपये दंड व दंड न भरल्यास सहा महिने कारावासाची शिक्षा सुनावली आहे. सदर प्रकरणात सरकारी वकिल ॲड बी.एस. राख यांनी काम पाहिले.

एक विषबाधा झालेली महिला अत्यावस्थ अवस्थेत रुग्णालयात शरीक झाली तिच्यावर उपचार करीत असतानां अजुन एक रुग्ण दवाखान्यात शरीक झाला त्यावेळी त्याचे नातेवाईकांनी आमच्या रुग्णावर आधी उपचार करा असे डॉक्टरंना म्हणत होते त्यावेळी डॉक्टरांनी त्यांना असे सांगितले की, दुसरा रुग्ण हा अत्यावस्थ असुन त्यावर उपचार करणे आवश्यक आहे. दोन्ही रुग्णांवर उपचार करतो मला वेळ दया असे म्हणाले त्याचवेळी आरोपी राहुल अदिनाथ बांगर हा डॉक्टरांच्या पाठीमागे अपघात विभागात गेला व त्याने डॉक्टरांना लाथाबुक्यांनी मारहाण केली

आरोपी राहुल अदिनाथ बांगर व इतरां विरुध्द क. ३५३,३३२,५०४,५०६,३४ भा.द.वि प्रमाणे व कलम ४/२५ भारतीय शस्त्र




कायदा तसेच कलम ४ महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था हिंसक

कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांस प्रतिबंध अधिनियम अधिनियम २०१० अन्वये पो. स्टे गेवराई येथे गु र.नं. २५८/२०१६ मध्ये गुन्हा नोंदवण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास ए. टी. मालुसरे, पो.उप. नि यांनी केला. त्यांनी सदर प्रकरणात तपास करून आरोपीविरूध्द न्यायालयात दोषारोपत्र दाखल केले.सदर प्रकरणाची सुनावणी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश-४थे बीड यांचे न्यायालयात झाली. सदर आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी सरकारी पक्षातर्फे एकुण ७साक्षीदार तपासण्यात आले. सदर प्रकरणात साक्षीदारांची साक्ष व घटनास्थळ पचं, फिर्यादी, डॉक्टर व तपासी अधिकारी यांचे पुराव्याचे अवलोकन करून जिल्हा सरकारी वकिल ॲड. बी.एस. राख यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, - ४थे श्री एस. एस. घोरपडेसाहेब, यांनी आरोपी राहुल अदिनाथ बांगर रा गेवराई यांना क. ३५३ भा.द.वि प्रमाणे दोषी ठरवुन तीन वर्ष सश्रम कारावास व रु. ५०००/- दंड व दंड न भरल्यास सहा महिने साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे. तसचे कलम ३३२ भादवी प्रमाणे एक वर्ष सश्रम कारावास व रु. १०००/- दंड व दंड न भरल्यास १ महिन्याचा कारावास तसेच कलम ५०६ प्रमाणे एक वर्ष सश्रम कारावास व रु. १०००/- दंड व दंड न भरल्यास १ महिन्याचा कारावास तसेच कलम ४ महाराष्ट्र वैद्यकीय सेवा व्यक्ती आणि वैद्यकीय सेवा संस्था हिंसक कृत्ये व मालमत्तेची हानी किंवा नुकसान यांस प्रतिबंध अधिनियम २०१० प्रमाणे १ वर्षे सश्रम करावास व १००० रु दंड व दंड न भरल्यास १ महिना साधी कैदेची शिक्षा सुनावण्यात आलेली आहे. सदर प्रकरणा मध्ये सरकारी पक्षातर्फे अडॅ. बी. एस. राख यांनी काम पाहिले. तसेच या प्रकरणी पैरवी अधिकारी पोलीस कॉन्स्टेबल श्री. ऋषीकेश सानप, एलपीसी एस. ए. चव्हाण मॅडम ब.नं. ५६५ यांनी सहकार्य केले.

# थकीत पीक कर्जावरील व्याज भरण्यासंदर्भात शेतकऱ्यांना मोठा दिलासा

## सरकारने बँकांना दिला हा आदेश

मुंबई / प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतून दोन लाखापेक्षा कर्ज थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्याची रु. दोन लाखावरील रक्कम बँकेत भरल्यानंतर शासनामार्फत एकवेळ समझोता अंतर्गत रु. दोन लाख इतका लाभ आणि पीककर्जाची नियमित परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रुपये पन्नास हजार पर्यंतचा प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे.

या योजनेअंतर्गत कर्जमुक्ती, एकवेळ समझोता या घटकांमध्ये अल्पमुदत पीककर्ज व पीककर्जाचे पुनर्गठन/फेरपुनर्गठन केलेल्या कर्जाचे थकीत हफ्ते यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर योजना अंमलबजावणीच्या अनुषंगाने मानक कार्यपद्धती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर योजनेच्या संगणकीय प्रणालीवर थकीत कर्जखात्यांची माहिती तयार करण्याचे व संगणकीय प्रणालीवर सादर करावयाचे कामकाज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्थामार्फत सुरु आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी व



विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी शेतकऱ्यांच्या थकित कर्जखात्याची माहिती संगणकीय प्रणालीवर सादर केल्यानंतर योजना मानक कार्यपद्धतीनुसार कर्जखात्यांचे संगणकीय संस्करण, अपात्रतेच्या निकषानुसार कर्जखात्यांचे विलगीकरण, शेतकऱ्यांमार्फत आधार प्रमाणीकरण व तद्नंतर कर्जमाफी रक्कमेचे कर्जखात्यामध्ये हस्तांतरण इ. कार्यवाही करण्यात येणार आहे. या प्रक्रियेस काही कालावधी लागणार असल्याने शेतकऱ्यांच्या कर्जखात्यामध्ये कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष हस्तांतरीत होण्यास काही कालावधी लागणार आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, सदर योजनेअंतर्गत सर्व शेतकऱ्यांची खाती निरंक होऊन त्यांना नव्याने कर्ज उपलब्ध होण्याच्या दृष्टीने व्यापारी बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्था यांच्या कृतीत एकवाक्यता असणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी कर्जमाफी व एकवेळ समझोता योजनेअंतर्गत दि. ०१.०४.२०२६ ते प्रत्यक्ष योजनेचा लाभ मिळेपर्यंत थकीत पीक कर्जाच्या रकमेवर व्याज आकारण्यात येऊ नये असे निर्देश सर्व संबंधितांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७९अ खाली देणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक झाले आहे.

# भुईमुग पिकासाठी जिप्सम वरदानच

## जाणून घ्या फायदे आणि वापर

भुईमुग हे महत्त्वाचे गळीत धान्य पीक आहे. या पिकामध्ये उत्पादन वाढीसाठी मुख्य अन्नद्रव्ये म्हणजेच नत्र, स्फुरद आणि पालाश सोबतच जिप्समचा वाटा प्रमुख आहे. जिप्सममध्ये कॅल्शिअम (२४%) व गंधक (१८.६%) हे मुख्य घटक आहेत. हे दोन्ही घटक आऱ्याच्या वाढीसाठी आणि शेंगा पोसण्यासाठी उपयुक्त ठरतात.

जिप्समच्या वापराचे फायदे : जमिनीची सुपीकता वाढून ती भुसभुशीत होते. क्षारपड जमीन जिप्समच्या वापरामुळे सुधारते. बियाण्यांची उगवण क्षमता जिप्सममुळे वाढते. जिप्सममुळे पाण्यातील क्षारांचा निचरा होण्यास मदत होते. सेंद्रिय पदार्थ लवकर कुजतात. पिकाची अन्नद्रव्य शोषून घेण्याची क्षमता वाढते. फळांची, पिकांची गुणवत्ता सुधारते. भुईमुग पिकासाठी कॅल्शिअम व गंधक यांचा पुरवठा करण्यासाठी जिप्सम स्वस्त पडते. जिप्सममध्ये कॅल्शिअम (२४ टक्के) व गंधक (१८.६ टक्के) हे मुख्य घटक आहे. शेतकऱ्यांच्या शेतातील प्रात्यक्षिकामध्ये जिप्समचा उपयोग केलेल्या शेतामध्ये शेंगांचे उत्पादन वाढल्याचे आढळले.

जिप्सम वापर पद्धती : भुईमुगाची काढणी होईपर्यंत शेतात घातलेला जिप्सम संपतो. म्हणून दर हंगामात या पिकाला जिप्सम द्यावा लागतो. भुईमुगाच्या पेरणीपासून २५ ते ३५ दिवसांनी फुलधारणेवेळी प्रति हेक्टरी ५०० किलो जिप्सम द्यावा. जिप्समची बारीक भुकटी फूल धरण्याच्या अवस्थेत जमिनीच्या पृष्ठभागावर शक्य तितकी झाडांच्या बुंध्याजवळ पसरून द्यावी. कारण जमिनीच्या पृष्ठभागाच्या ५ सेंटिमीटर थरातील कॅल्शिअम, आऱ्या व पोसणाऱ्या शेंगांच्या उपयोगी पडतो. जिप्समचा वापर करण्यापूर्वी माती परिक्षण करून जमिनीचा सामू किती आहे त्यानुसार जिप्समची मात्रा ठरवावी. साधारणपणे ८ पेक्षा जास्त सामू असलेल्या जमिनीमध्ये इतर खतासोबत एकरी ३०० ते ५०० किलो जिप्समचा वापर करावा.



# शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे आणि उपाय!

शेळीपालन व्यवसायाचा विचार केला तर प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी शेळ्यांचे पालन केले जाते. परंतु शेळ्यापासून मिळणारे मांस उत्पादन हे शेळ्यांच्या वजनावर अवलंबून असते. बऱ्याचदा काही कारणांमुळे शेळ्यांचे वजन कमी होते किंवा वाढत नाही व त्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो. मात्र शेळ्यांचे वजन कमी होण्याची कारणे व उपाययोजना यांची माहिती घेतली तर यातून मार्ग निघू शकतो.

शेळ्यांचे वजन कमी होण्याचे कारणे : शेळ्यांमध्ये बऱ्याच प्रकारचे रोग उद्भवतात व त्यामुळे वजनावर विपरीत परिणाम होतो. दुसरे कारण म्हणजे जेव्हा कळपात शेळ्या राहतात तेव्हा चाऱ्यासाठी एकमेकांमध्ये स्पर्धा निर्माण होते, ही बाब देखील शेळ्यांच्या शरीराचे वजन कमी करण्यास कारणीभूत आहे. कळपामध्ये ज्या शेळ्या थोड्या दुर्बल किंवा विनम्र असतात अशा शेळ्यांचे वजन कमी होते. साहाजिकच कळपातील मजबूत आणि मोठ्या शेळ्या कमकुवत शेळ्यांच्या अन्न आणि जागेवर अधिकचा हक्क सांगतात व आहारात प्रवेश नाकारला जात असल्याने कमकुवत शेळ्यांना चारा व्यवस्थित मिळत नाही व शेळ्यांचे वजन घटते. या समस्येवर उपाय म्हणून शेळ्यांचे व तसेच त्यांच्या जाती व शारीरिक स्थितीनुसार त्यांचे वर्गीकरण करणे नेहमीच योग्य असते. जर शेळ्यांमध्ये दातांची समस्या असेल तर यामुळे देखील वजन कमी होऊ शकते. दातांच्या समस्या मुळे चारा खाण्याच्या आणि गिळण्याच्या सामान्य प्रक्रियेवर विपरीत परिणाम होतो. यामुळे शेळ्यांना पुरेशा चाऱ्यापासून वंचित



राहावे लागते. या समस्येवर उपाय म्हणून वजन कमी करण्याच्या तपासणीमध्ये दात परिक्षण करून घेणे महत्त्वाचे असते. दातांची समस्या ही विविध प्रकारच्या खनिजांची कमतरता किंवा फ्लोरोसिसच्या अतिरेकामुळे होत असते. हार्ड स्टेनिंग हार्ड ड्राफ्टिंग, जबडा सुजणे हे देखील वजन कमी होण्याची प्रमुख कारणे आहेत. या समस्येचे निदान करायचे असेल तर शेळ्यांच्या तोंडाची तपासणी वेळोवेळी करावी.

काही सूक्ष्म पोषक घटकांची कमतरता जसे कॉपर, कोबाल्ट आणि सेलेनियम या आवश्यक सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेमुळे किंवा असंतुलनामुळे देखील शेळ्यांमध्ये वजन कमी होऊ शकते. कोबाल्टची कमतरता असली तर शरीराच्या वजनात वाढ होणे थांबते. सेलेनियम हे मेंढी पालन आणि शेळीपालन मध्ये एक महत्त्वाचा घटक आहे. याच्या कमतरतेमुळे मादी प्राण्यांमध्ये गर्भपात आणि प्रजनन संस्थेचे समस्या वाढते. याच्या कमतरतेमुळे कोकरांची कमकुवत वाढ होते व विकास देखील थांबतो. एवढेच नाही तर कोकरामध्ये अचानक मृत्यूचे समस्या देखील दिसून येते.

या समस्येला श्वेत स्नायू रोग म्हणतात. या समस्येवर उपाय म्हणून जनावरांना खनिज मिश्रण पावडर दिले गेले पाहिजे. जोन्स रोग मेंढी आणि शेळ्यांमधील जुनाट आजार आहे व हा वजन कमी करण्यासाठी कारणीभूत ठरतो. यामध्ये खाद्य योग्य प्रमाणात खाल्ले तरीही प्रादुर्भावित प्राण्याच्या जबड्यात खाली पाणी जमा होते, अशक्तपणा येतो तसेच मेंढ्यांमध्ये लोकर कमी होते, हगवन इत्यादी लक्षणे दिसतात. शेळ्यांच्या पायाला लंगडेपणा असणे हीदेखील एक समस्या असून हा रोग एका प्राण्यापासून दुसऱ्या प्राण्यांमध्ये पसरतो व वजन कमी करत असतो.

# जमिनीच्या गुणधर्मानुसार खत व्यवस्थापन

शेतीमध्ये भरघोस उत्पादन मिळवण्यासाठी केवळ अधिक खतांचा वापर करणे पुरेसे नसते. प्रत्येक जमिनीचे गुणधर्म वेगवेगळे असल्यामुळे खत व्यवस्थापनही त्यानुसार करणे आवश्यक असते. जमिनीचा पोत, सामू , सेंद्रिय कर्बाचे प्रमाण, ओलावा धारण क्षमता आणि अन्नद्रव्यांची उपलब्धता यांचा विचार करून खतांची निवड केल्यास पिकांची वाढ चांगली होते, खतांचा अपव्यय कमी होतो आणि जमिनीचे आरोग्यही दीर्घकाळ टिकून राहते. जमिनीची तपासणी का आवश्यक : खत व्यवस्थापनाची सुरुवात नेहमी मृदा परीक्षणापासून करावी. माती परीक्षणाद्वारे जमिनीत नत्र, स्फुरद, पालाश, सूक्ष्म अन्नद्रव्ये आणि सेंद्रिय कर्ब यांची माहिती मिळते. या अहवालाच्या आधारे आवश्यक त्या प्रमाणात खतांचा वापर केल्यास खर्च कमी होतो आणि उत्पादनात वाढ होते. जमिनीचा सामू आणि खत व्यवस्थापन : जमिनीचा पीएच हा अन्नद्रव्यांच्या उपलब्धतेवर मोठा परिणाम करतो. अशा जमिनीत चुना किंवा डोलोमाइटचा वापर करून पीएच सुधारावा. त्यामुळे अन्नद्रव्यांचे शोषण सुधारते. क्षारयुक्त जमीन – जिप्सम, सेंद्रिय खत आणि योग्य निचऱ्याची व्यवस्था करावी. त्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते. योग्य पीएच असल्यास पिकांना खतांचा अधिक फायदा मिळतो.

हलकी (वालुकामय) जमीन : या जमिनीत



पाणी आणि अन्नद्रव्ये लवकर निघून जातात. त्यामुळे रासायनिक खते एकाच वेळी न देता विभागून द्यावीत. सेंद्रिय खतांचा वापर वाढवावा.

मध्यम जमीन : ही जमीन बहुतांश पिकांसाठी योग्य असते. संतुलित रासायनिक आणि सेंद्रिय खतांचा वापर केल्यास चांगले उत्पादन मिळते.

भारी (चिकण) जमीन : या जमिनीत पाणी जास्त काळ टिकते. त्यामुळे खतांचे योग्य प्रमाण आणि वेळेवर व्यवस्थापन आवश्यक असते. अतिरिक्त खतांचा वापर टाळावा.

सेंद्रिय खतांचे महत्त्व : शेणखत, कंपोस्ट, गांडूळ खत आणि हिरवळीची खते यांचा नियमित वापर केल्यास जमिनीतील सेंद्रिय कर्ब वाढतो. यामुळे मातीची पाणी धारण क्षमता सुधारते, उपयुक्त सूक्ष्मजीवांची वाढ होते आणि रासायनिक खतांची कार्यक्षमता वाढते. संतुलित खत व्यवस्थापन : पिकांच्या गरजेनुसार नत्र, स्फुरद आणि पालाश यांचे संतुलित प्रमाणात व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. एका अन्नद्रव्याचा अतिरेक केल्यास इतर अन्नद्रव्यांचे शोषण कमी होऊ शकते. त्यामुळे मृदा परीक्षण अहवालानुसार खतांचा वापर करणे अधिक फायदेशीर ठरते. सूक्ष्म अन्नद्रव्यांकडे दुर्लक्ष नको : जस्त, गंधक, बोरॉन, लोह आणि मॅग्नेशियम यांसारख्या सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास पिकांची वाढ खुंटते, पाने पिवळी पडतात आणि उत्पादन घटते. आवश्यकतेनुसार सूक्ष्म अन्नद्रव्यांचा वापर करावा. ओलाव्याचे व्यवस्थापन : खतांचा परिणाम योग्य होण्यासाठी जमिनीत पुरेसा ओलावा असणे आवश्यक आहे. कोरड्या जमिनीत दिलेली खते पूर्णपणे उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे सिंचनाचे योग्य नियोजन करावे आणि पावसाळ्यात अतिरिक्त पाण्याचा निचरा ठेवावा. शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक सूचना : प्रत्येक २ ते ३ वर्षांनी मृदा परीक्षण करा. जमिनीच्या गुणधर्मानुसारच खतांचा वापर करा. सेंद्रिय आणि रासायनिक खतांचा संतुलित वापर करा. शिफारशीपेक्षा जास्त खतांचा वापर टाळा. सूक्ष्म अन्नद्रव्यांची कमतरता असल्यास योग्य प्रमाणात त्यांची पूर्तता करा. जमिनीचे आरोग्य टिकवण्यासाठी पीक फेरपालट आणि सेंद्रिय पदार्थांचा वापर वाढवा. जमिनीच्या गुणधर्मानुसार खत व्यवस्थापन केल्यास उत्पादनात वाढ, खतांचा कमी खर्च आणि जमिनीची दीर्घकालीन सुपीकता टिकवून ठेवणे शक्य होते. मृदा परीक्षण, संतुलित खतांचा वापर, सेंद्रिय खतांचे महत्त्व आणि योग्य सिंचन व्यवस्थापन यांचा अवलंब केल्यास शेतकऱ्यांना अधिक नफा मिळू शकतो. शास्त्रीय पद्धतीने खत व्यवस्थापन करणे हीच शाश्वत आणि फायदेशीर शेतीची गुरुकिल्ली आहे.





### महत्वाच्या घटना

१०५४ : वृषभ राशीत 'क्रॅब नेब्यूला' दिसत असल्याचे चिनी लोकांना समजले. नंतर जॉन बेव्हिसने इ. स. १७३१ मधे त्याचे निरीक्षण केल्याची नोंद आहे.

१७७६ : अमेरिकेने स्वत:ला इंग्लंडपासून स्वतंत्र घोषित केले.

१७८९ : इस्ट इंडिया कंपनीने मराठा शासक पेशवा आणि निजाम शासक यांच्याबरोबर टिपू सुलतान यांच्या विरुद्ध खिलाफत ची संधी केली.

१८२६ : अमेरिकेच्या स्वातंत्र्य दिनाच्या सुवर्णमहोत्सवाच्या दिवशी अमेरिकेचे तिसरे राष्ट्राध्यक्ष थॉमस जेफरसन आणि दुसरे राष्ट्राध्यक्ष जॉन अ‍ॅडम्स यांचे निधन झाले.

१८८६ : फ्रांसने अमेरिकेला स्टॅच्यू ऑफ लिबर्टी हे भेट दिले.

१९०३ : मोटर रेस स्पर्धे मध्ये भाग घेणारी डॉरोथी लेव्हिट ही पहिली इंग्लिश महिला ठरली.

१९११ : स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या एकांतवासास प्रारंभ

१९३६ : 'अमरज्योती' हा 'प्रभात'चा चित्रपट मुंबईच्या 'कृष्ण' सिनेमात प्रदर्शित झाला.

१९४६ : सुमारे ३८१ वर्षे परकीय सत्तांनी राज्य केल्यानंतर फिलीपाइन्सला (अमेरिकेपासून) स्वातंत्र्य मिळाले.

१९४७ : ब्रिटिशांच्या ताब्यात असलेल्या भारताचे 'भारत' व 'पाकिस्तान' असे दोन स्वतंत्र देश निर्माण करावेत असा ठराव ब्रिटनच्या संसदेत मांडण्यात आला.

१९९५ : टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या जायंट मीटरवेव्ह रेडिओ टेलिस्कोपचे संचालक डॉ. गोविंद स्वरूप यांना एम. पी. बिर्ला पुरस्कार प्रदान

१९९७ : 'नासा'चे पाथफाइंडर हे मानवविरहित यान मंगळावर उतरले.

१९९९ : लष्कराच्या १८ व्या बटालियनने कारगिलमधील द्रास या उपविभागातील 'टायगर हिल्स' हा लष्करीदृष्ट्या अतिशय महत्त्वाचा टापू घुसखोरांच्या ताब्यातून मुक्त केला. याबद्दल लष्करप्रमुख वेदप्रकाश मलिक यांनी १८ व्या युनिटला 'युनिट सायटेशन' हा विशेष सन्मान जाहीर केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७९० : भारताचे सर्वेक्षण करणारे कर्नल सर जॉर्ज एव्हरेस्ट (मृत्यू: १ डिमेंबर १८६६)

१८०७ : जुसेप्पे गॅरीबाल्डी  इटालियन सेनापती व राजकीय नेता (मृत्यू: २ जून १८८२)

१८९७ : भारतीय कार्यकर्ते अलारी सीताराम राजू यांचा जन्म. (मृत्यू: ७ मे १९२४)

१८९८ : गुलजारीलाल नंदा – भारताचे दुसरे पंतप्रधान, स्वातंत्र्यसैनिक व गांधीवादी कार्यकर्ते (मृत्यू: १५ जानेवारी १९९८)

१८७२ : काल्व्हिन कूलिज – अमेरिकेचे ३० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: ५ जानेवारी १९३३)

१८८२ : एकेडेमी ऑफ मोशन पिक्चर आर्ट्स अँड सायन्सचे स्थापक लुईस बी. मेयर यांचा जन्म. (मृत्यू: २९ ऑक्टोबर १९५७)

१९१२ : पं. निवृत्तीबुवा सरनाईक – जयपूर–अत्रौली घराण्याचे गायक (मृत्यू: १६ फेब्रुवारी १९९४)

१९१४ : निवृत्तीनाथ रावजी पाटील ऊर्फ 'पी. सावळाराम' – भावगीतलेखक. कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली. (मृत्यू: २१ डिसेंबर १९९७)

१९१६ : भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्री नसीम बानो यांचा जन्मदिन.

१९२६ : विनायक आदिनाथ तथा 'वि. आ.' बुवा – विनोदी साहित्यिक (मृत्यू: १७ एप्रिल २०११)

१९८३ : भारतीय–इंग्लिश पत्रकार अमोल राजन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७२९ : कान्होजी आंग्रे – सेना सरखेल (जन्म: ऑगस्ट १६६९)

१८२६ : जॉन अ‍ॅडम्स – अमेरिकेचे २ रे राष्ट्राध्यक्ष आणि पहिले उपराष्ट्राध्यक्ष (जन्म: ३० आक्टोबर १७३५)

१८२६ : थॉमस जेफरसन – अमेरिकेचे ३ रे राष्ट्राध्यक्ष, २ रे उपाध्यक्ष आणि १ ले परराष्ट्रमंत्री. त्यांनी मांडलेल्या विचारांवर अमेरिकेची राज्यघटना आधारित असून तेथील लोकशाहीला 'जेफरसनची लोकशाही' असे म्हणतात. (जन्म: १३ एप्रिल १७४३)

१८३१ : जेम्स मोन्रो – अमेरिकेचे ५ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: २८ एप्रिल १७५८)

१९०२ : स्वामी विवेकानंद – भारतीय तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार करणारे तत्त्वज्ञ, रामकृष्ण परमहंस यांचे शिष्य, गुरुंची स्मृती चिरंतन राहावी यासाठी त्यांनी 'रामकृष्ण मिशन'ची स्थापना केली. (जन्म: १२ जानेवारी १८६३)

१९३४ : मेरी क्यूरी – नोबेल पारितोषिक विजेत्या पोलिश–फ्रेन्च भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: ७ नोव्हेंबर १८६७)

१९६३ : पिंगाली वेंकय्या – भारतीय तिरंग्याचा रचनाकार (जन्म: २ ऑगस्ट १८७६)

१९८० : रघुनाथ वामन दिघे – रसाळ लेखन करणारे कादंबरीकार. 'पाणकळा', 'सराई', 'पड रे पाण्या', 'आई आहे शेतात', 'गानलुब्धा', 'मृगनयना' वगैरे त्यांच्या कादंबर्‍या अतिशय गाजल्या. (जन्म: २४ एप्रिल १८९६)

१९८२ : भरत व्यास – भक्तिप्रधान, पौराणिक, ऐतिहासिक व सामाजिक चित्रपटांचे गीतकार (जन्म: १९१८)

१९९९ : वसंत शिंदे – विनोदसम्राट, कलागौरव पुरस्कार, चित्रभूषण पुरस्कार व बालगंधर्व पुरस्काराने सन्मानित (जन्म: १४ मे १९०९).



शनिवार दि.४ जुलै २०२६ ५

राज्य लोकतंत्र

मराठवाडा वृत्तांत



# विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन योजनेचा शुभारंभ

जालना । प्रतिनिधी

जालना तालुक्यातील मौजे उटवद येथे आज विकसित भारत रोजगार व आजीविका हमी मिशन (ग्रामीण) अर्थात 'विकसित भारत जी-रामजी' कायदा, २०२५ अंतर्गत जिल्हास्तरीय उद्घाटन सोहळा आणि जनसंवाद संमेलन उत्साहात पार पडले. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांच्या हस्ते योजनेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी, महिला बचत गट, आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका, ग्रामस्थ आणि रोजगार हमी योजनेवरील मजूर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी उपजिल्हाधिकारी (रोहयो) मनीषा दांडगे यांनी प्रस्तावना करताना पूर्वीच्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा), २००५ आणि नव्या विकसित भारत जी-रामजी कायदा, २०२५ मधील महत्त्वाचे बदल स्पष्ट केले. त्यांनी १ जुलै २०२६ पासून देशभरात या



कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्याची माहिती देत, योजनेची उद्दिष्टे, वैशिष्ट्ये आणि ग्रामीण विकासासाठी असलेले महत्त्व उपस्थितांना सविस्तरपणे सांगितले.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम करण्यासाठी जलसुरक्षा, ग्रामीण पायाभूत सुविधा, आजीविका पायाभूत सुविधा आणि हवामान बदल या चार प्रमुख क्षेत्रांवर योजनेत विशेष भर देण्यात आल्याचे सांगितले. गावांच्या गरजेनुसार सर्वसमावेशक विकास आराखडा तयार करून लोकसहभागातून दर्जेदार, शाश्वत आणि कायमस्वरूपी सार्वजनिक मालमत्ता उभारणे हा या योजनेचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी मित्तल पुढे म्हणाल्या की, प्रशासन आणि ग्रामस्थ यांच्या समन्वयातून गावांचा सर्वांगीण विकास साधता येईल. एल निनोमुळे उद्भवणाऱ्या संभाव्य परिस्थितीचा विचार करून जलसंधारणाची अधिकाधिक कामे हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी 'जालना जलकवच अभियान-२०२६' आणि 'विकसित भारत जी-रामजी' योजनेच्या माध्यमातून 'पाणी अडवा, पाणी जिरवा' या संकल्पनेला चालना देणारी कामे मोठ्या प्रमाणावर राबविण्याचे आवाहन त्यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांनी क्षेत्रीय स्तरावर कार्यरत कर्मचाऱ्यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे नमूद केले. मनरेगा योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात जलसंधारण, पाणंद रस्ते आणि घरकुलांसारखी अनेक दर्जेदार कामे पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले. नव्या योजनेअंतर्गतही कामांची गुणवत्ता, पारदर्शकता आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी हक्क संरक्षण प्रतिज्ञेचे सामूहिक वाचन केले. त्यानंतर विकसित भारत जी-रामजी कायदा २०२५ अंतर्गत सार्वजनिक वृक्षलागवड मोहिमेचा शुभारंभ जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते करण्यात आला, तर जलतारा कामाचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी कृष्णकांत कनवारीया यांच्या हस्ते करण्यात आला.

या कार्यक्रमास, प्रभारी तहसीलदार प्रणाली तायडे, तालुका कृषी अधिकारी विष्णू राठोड, यांच्यासह जिल्हा व तालुका स्तरावरील अधिकारी, तांत्रिक सहाय्यक, संगणक परिचालक, महिला बचत गटांच्या सदस्य, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर्स, ग्रामस्थ आणि मोठ्या संख्येने रोजगार हमीवरील मजूर उपस्थित होते.

# हॉस्पिटलने जपली माणुसकी; भटक्या समाजातील वृद्धावर यशस्वी उपचार



जालना । प्रतिनिधी

आर्थिकदृष्ट्या अत्यंत दुर्बल असलेल्या भटके समाजातील ७० वर्षीय वृद्धावर वेळेत व यशस्वी उपचार करून जालन्यातील एका हॉस्पिटलने माणुसकीचा आदर्श जपला आहे. रुग्णाची गंभीर अवस्था असूनही आर्थिक परिस्थितीचा विचार न करता डॉक्टरांनी तातडीने उपचार सुरू केल्याने त्यांचे प्राण वाचविण्यात यश आले.गावोगावी फिरून आयुर्वेदिक औषधांची विक्री करून उदरनिर्वाह करणाऱ्या भटके कुटुंबातील या वृद्धाला अचानक तीव्र छातीत दुखू लागल्याने रात्री सुमारे २ वाजता एका हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. आवश्यक वैद्यकीय तपासण्या आणि कोरोनरी अँजिओग्राफी केल्यानंतर हृदयाच्या तीन रक्तवाहिन्यांमध्ये गंभीर ब्लॉकेज असल्याचे निदान झाले. त्यानंतर तातडीने कोरोनरी अँजिओप्लास्टी करण्याची आवश्यकता डॉक्टरांनी व्यक्त केली.

मात्र, रुग्णाकडे शासकीय आरोग्य योजनांचा लाभ मिळविण्यासाठी आवश्यक कागदपत्रे नव्हती. कायमस्वरूपी पत्ता नसल्याने कोणत्याही योजनेचा लाभ मिळू शकला नाही. उपचारासाठी सुमारे दीड लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. अत्यंत हलाखीची आर्थिक परिस्थिती असूनही कुटुंबीयांनी नातेवाईकांकडून २०, ५० आणि १०० रुपयांच्या स्वरूपात वर्गणी गोळा करून अवघ्या दोन दिवसांत सुमारे ७० हजार रुपये जमा केले. रुग्णाची प्रकृती गंभीर असल्याचे लक्षात घेऊन डॉक्टरांनी उपचार सुरू केले. यशस्वी अँजिओप्लास्टीनंतर रुग्णाला अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले. मात्र, तीन दिवसांनी त्यांना पुन्हा हृदयविकाराचा तीव्र झटका आला आणि रक्तदाब झपाट्याने कमी होऊ लागला. तत्काळ शॉक ट्रीटमेंट देऊन त्यांना व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले. डॉक्टरांनी अथक प्रयत्न आणि सातत्यपूर्ण उपचार केल्यामुळे रुग्णाची प्रकृती हळूहळू सुधारली आणि तब्बल २० दिवसांच्या उपचारानंतर त्यांना आयसीयूमधून बाहेर आणण्यात आले.या काळात हॉस्पिटलमधील वैद्यकीय अधिकारी, परिचारिका आणि कर्मचाऱ्यांनीही संवेदनशीलतेने सेवा देत उपचारात कोणताही विलंब होऊ दिला नाही.

तसेच यावेळी या पेशंटचे सर्व नातेवाईक यांनी डॉक्टरांवर ठेवलेला विश्वास व नातेवाईक यांनी केलेले सहकार्य यामुळे हे शक्य झाले. वेळेत मिळालेल्या उपचारांमुळे वृद्धाचे प्राण वाचल्याने त्यांच्या कुटुंबीयांनी डॉक्टर व संपूर्ण वैद्यकीय पथकाचे मनःपूर्वक आभार मानले.

## टीसी हरवला आहे

कु.उगले वर्षा बबन या विद्यार्थिनीचा इयत्ता बारावी पासचा टी. सी. बीड-जांब प्रवसादरम्यान हरवला आहे.सापडल्यास संपर्क करा.

संपर्क

कु.उगले वर्षा बबन

मो.९३०९२५७६८५

# ग्रामसेवक,तलाठी यांच्या विरोधात तहसील कार्यालयासमोर उपोषण

अंबड । प्रतिनिधी

घर नावावर करीत नसल्यामुळे ग्रामसेवक व तलाठी यांच्या विरोधात अंबड तहसील कार्यालय समोर उपोषण करण्यात येणार आहे. असे निवेदन तहसीलदार व गटविकास अधिकारी, पोलीस निरीक्षक, यांना देण्यात आले आहे. कर्जत येथील निवासी घर नेमाप्रमाणे नावावर ग्रामसेवक करीत नसल्यामुळे उपोषण करण्यात येणार आहे. २५- मार्च-२०२६ नुसार शासन निर्णय नुसार समीतीला विश्वासात न घेता परस्पर आठ अ उतारे जागेचे दिल्यामुळे याप्रकरणी चौकशी करण्यात यावी. तसेच मौजे कर्जत येथील डॉ. आण्णाभाऊ साठे यांचे पुतळया जवळ झालेले अतिक्रण तात्काळ काढण्यात यावी.

सुनिल काळुके यांचे सरकारी गायरान जमिनीत गट नं. २४६ मध्ये निवासी घरासाठी सन १९९८ पासून रहात असून मी त्या जागेचा आजरोजी उपभोग घेत आहे. सदरील शासन निर्णयानुसार माझे गायरान जमीनीतील निवासी घर नियमाकुल करण्यात यावे सदर जागेत शासनाने दिलेले घरकुल बांधकाम केलेले आहे नळपट्टी टॅक्स पावती इ. मी नियमानुसार भरत आहे. तरी सदर गायराणातील घर निवासी जागा माझे नावे करण्यात यावी. तसेच मौजे कर्जत येथील गट नं. २४६ गायरान जमीनीमध्ये काही लोकांना संबधीत ग्रामसेवक तसेच तलाठी यांनी संगणमत करुन काही लोकांना आठ अ उतारे जागेचे दिले आहेत त्यांनी कोणत्याही स समीतीला विश्वासात न घेता आर्थिक व्यवहार करुन बेकायदेशीर जागेचे आठ अ उतारे दिले आहे.

या बाबत तात्काळ चौकशी करुन संबधीत अधिकारी व कर्मचारी यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावे. तसेच मौजे कर्जत येते अण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्याच्या बाजुने गावातील काही लोकांनी पुतळ्याच्या बाजूने अंगणवाडी भाग क्र. २पासून पुतळ्यास पर्यंतचे काही लोकांनी पत्राचे शेड मारुन अतिक्रण केले आहे. त्यामुळे आण्णाभाऊ साठे यांचा पुतळा झाकल्या जात आहे. याची तात्काळ पहानी करुन पंचनामा करुन पुतळ्या समोरील अतिक्रमण तात्काळ हटविण्यात यावे अशी मागणी करण्यात आली नसता अंबड तहसील कार्यालया समोर ६ जुलै सोमवार रोजी सकाळी अमरण उपोषणास बसणार आहे. सदर कामे काही अनुचित घटना घडल्यास व माझे जिवीतास काही झाल्यास यांची संपुर्ण जबाबदारी तलाठी व ग्रामसेवक यांची वर राहील असे निवेदन म्हटले आहे.

# मुस्लिम समाजाने गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर द्यावा- डॉ. खान

छत्रपती संभाजीनगर

छत्रपती संभाजीनगर सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक स्थित्यंतरे वेगाने घडत आहे. अशा वेळी मुस्लिम समाजाने गुणवत्तापूर्ण शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. संयमित, सकारात्मक आणि शिस्तबद्ध वागणुकीतून स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवण्यावर भर द्यावा. त्यानेच समाजाची सर्वांगीण प्रगती साधता येईल, असे प्रतिपादन माजी खासदार तथा माजी मंत्री डॉ. फौजिया खान यांनी केले. सामाजिक कार्य तसेच राज्यसभेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल फेडरेशन ऑफ ऑल मायनॉरिटी एज्युकेशनल ऑर्गनायझेशनच्या वतीने डॉ. फौजिया खान यांचा मौलाना आझाद संशोधन सभागृहात सत्कार करण्यात आला. या वेळी बीसीयूडीचे माजी संचालक डॉ. ए. जी. खान, जामिया इस्लामिया काशिफूल उलूमचे अध्यक्ष हाजी अब्दुल जब्बार, एव्हरेस्ट एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अब्दुल गफ्फार कादरी, हसीन अख्तर, डॉ. मकदुम फारुकी आदींची उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना डॉ. खान म्हणाल्या, राज्यसभेच्या सदस्य म्हणून विविध लोकहिताच्या प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा केला. केंद्र सरकारच्या सहकार्याने मराठवाड्यात आरोग्य आणि शिक्षण क्षेत्रातील अनेक महत्त्वपूर्ण प्रकल्प सुरू करण्यासाठी प्रयत्न केले.

''बिफोर करोना मेमरीज फेड' पुस्तकाचे प्रकाशन या वेळी कोरोनाकाळात महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाने केलेल्या सामाजिक कार्याची नोंद असलेले सय्यद रिजवानउल्लाह लिखित बिफोर करोना मेमरीज फेड या पुस्तकाचे प्रकाशन झाले. या वेळी खालिद सैफुद्दीन, मोहंमद वासिल, डॉ. इरफान रऊफ आणि पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# माहोराच्या सरपंचाकडून सरकारी जागेवर अतिक्रमण

## सरपंचपद अपात्र ठरविण्याची मागणी

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील माहोरा गावचे सरपंच सुभाष दासू चव्हाण यांनी सरकारी गायरान जमिनीवर सिमेंट कॉंक्रीटचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याप्रकरणी त्यांना सरपंच पदावरून पायउतार करावे अन्यथा ; १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा तुकाराम धनु राठोड यांनी दिला आहे.

या संदर्भात मा. जिल्हाधिकारी जालना यांना लेखी निवेदन दिले असून माहोरा गावचे सरपंच सुभाष दासू चव्हाण यांनी सरकारी गायरान जमिनीवर सिमेंट कॉंक्रेटचे बांधकाम करून अतिक्रमण केल्याची तक्रार करण्यात आली होती. यासंदर्भात संबंधित सरपंचाने सरकारी गायरान जमिनीवर अतिक्रमण केल्याचा अहवाल गटविकास अधिकारी यांनी प्रशासनाला पाठवूनही त्यांना अद्याप सरपंच पदावरून पायउतार करण्यात आलेले नाही. याउलट तक्रारी का केल्या म्हणून सरपंचाने शिवीगाळ व मारहाण केली होती. या संदर्भात सेवली पोलीस स्टेशन येथे सरपंच विरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आलेली आहे. वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे स्वातंत्र्यदिनी आमरण उपोषणाचा मार्ग निवडल्याचे तुकाराम धनु राठोड यांनी निवेदनात म्हटले आहे. तसेच गावात मागील अनेक वर्षापासून सरपंचाच्या आशीर्वादाने अवैध दारू विक्री, जुगार अड्डे सुरू असून सरपंचा विरोधात अनेक गुन्ह्याची नोंद आहे. याप्रकरणी जिल्हाधिकारी जालना यांनी सखोल चौकशी करून सरपंच सुभाष दासू चव्हाण यांना सरपंच पदावरून पायउतार करावे अन्यथा ; १५ ऑगस्ट २०२६ स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा शेवटी निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती मा. विभागीय आयुक्त, मा. पोलीस अधीक्षक जालना, मा. उपविभागीय अधिकारी परतुर, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर, मा. तहसीलदार मंठा, मा. गटविकास अधिकारी मंठा यांना देण्यात आल्या आहेत.

## जाहीरप्रगटन

**मा. माणिकराव रा. सातव ५ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ८३७/२०२६**

**मुक्ताबाई व इतर इतर वि. निरंक**

अर्जदारः १ मुक्ताबाई भ्र. गुलाबराव वाघमारे, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, रा. कळसंबर, ता. जि. बीड. २. लक्ष्मण पि. गुलाबराव वाघमारे, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. कळसंबर, ता. जि. बीड. ३.गयाबाई भ्र. सुंदरराव कदम, वय ६० वर्षे, धंदा घरकाम, रा. नाळवंडी नाका, गजानन नगर, बीड, ता. जि. बीड.

विरुध्द गैअर्जदार: निरंक

मागणी : कलम २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. ज्याअर्थी गुलाब पि. श्रीपती वाघमारे यांचा मृत्यु दि.२७/०५/२००५ रोजी मौजे कळसंबर, ता. ता. जि. बीड येथे राहत्या घरी मयत झालेले असून अर्जदार मयत गुलाब पि. श्रीपती वाघमारे यांचे वारस आहे. वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहू मयत गुलाब पि. श्रीपती वाघमारे यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल यावीनोंद घ्यावी.आज दिनांक ०३ माहे ०७ सन २०२६ रोजी माझ्या सहिने व न्यायालयाचे शिक्याने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख ०१/०८/२०२६ आहे.

आदेशावरुन

स्वाक्षरित

**अधिक्षक**

दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड.

# स्वच्छता, आहारासह किशोरवयीनांना केले मार्गदर्शन

## तुळजापुरात 'माझे गाव आरोग्यसंपन्न गाव' अभियानाला गती

तुळजापूर। प्रतिनिधी

ग्रामपंचायत स्तरावर आरोग्यसंपन्न गाव कृती दलाच्या बैठका घेण्यात आल्याची माहिती देण्यात आली. शाळा व अंगणवाडीतील विद्यार्थ्यांमध्ये वैयक्तिक स्वच्छता, सकस आहार आणि आरोग्यदायी जीवनशैलीबाबत जनजागृती केली. किशोरवयीन मुला-मुलींसाठी वैयक्तिक स्वच्छता, जीवन कौशल्य प्रशिक्षण आणि किशोरवयीन आरोग्यविषयक मार्गदर्शन देण्यात आले. तसेच १० ते १६ जून या कालावधीत नेत्ररोग प्रतिबंध व उपचाराबाबत विशेष जनजागृती मोहीम राबवण्यात आल्याची माहिती बैठकीत देण्यात आली.

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राबवण्यात येणाऱ्या ''माझे गाव आरोग्य संपन्न गाव या महत्त्वाकांक्षी अभियानाला तुळजापूर तालुक्यात अधिक गती देण्यासाठी तालुकास्तरीय कृतिदल समितीची बैठक उत्साहात पार पडली. तालुका आरोग्य कार्यालयात आयोजित बैठकीत अध्यक्षपद गटविकास अधिकाऱ्यांनी भूषवले. या बैठकीत आरोग्यदायी, स्वच्छ आणि निरोगी गाव घडवण्यासाठी विविध विभागांनी समन्वयाने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. बैठकीला तालुका आरोग्याधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, बाल विकास प्रकल्प अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, श्रीकांत कदम आदींची उपस्थित होती. बैठकीत जून महिन्यात राबवण्यात आलेल्या उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. बैठकीच्या शेवटी ''माझे गाव आरोग्य संपन्न गाव'' हे अभियान लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे आणि जुलै महिन्यातील सर्व उपक्रम वेळेत पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. शेवटी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि प्रतिनिधींचे आभार मानले. वृक्षारोपण आणि हिवताप प्रतिबंधावर भर प्राथमिक आरोग्य केंद्र, शाळा आणि ग्रामपंचायत स्तरावर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेतला. नागरिकांनी दररोज योगाभ्यास करावा, यासाठी योगाचे महत्त्व गावागावात पोहोचवण्याचे निर्देश देण्यात आले. जून महिना 'हिवताप प्रतिरोध महिना' म्हणून कीटकजन्य आजारांची लक्षणे, प्रतिबंधात्मक उपाययोजना आणि स्वच्छतेचे महत्त्व याबाबत जागृती करण्यात आल्याचे सांगितले.

# शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

## वेदा प्रभाळे हिचा शाळेत सत्कार



बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, उमरद खालसा येथील इयत्ता पाचवीची विद्यार्थिनी कु. वेदा दत्तात्रय प्रभाळे हिने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून उत्तीर्ण होत शाळेचा, गावाचा व पालकांचा गौरव वाढविला. तिच्या या यशाबद्दल शाळेत विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी गुरू आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा मा. सीमा ओस्तवाल मॅडम व मा. नवनाथ अण्णा शिराळे यांच्या शुभहस्ते कु. वेदा हिला शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास गावचे प्रथम नागरिक तथा सरपंच श्री. गणेश घोडे, श्री. सुभाष गिराम, सामाजिक कार्यकर्ते श्री. विठ्ठल ढोकणे, शाळेचे मुख्याध्यापक मा. जोशी सर, क्षीरसागर सर, गिराम मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंद, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कु. वेदा हिच्या परिश्रम, जिद्द, सातत्यपूर्ण अभ्यास आणि यशाचे कौतुक करत तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी ध्येय निश्चित करून नियमित अभ्यास, शिस्त आणि चिकाटीच्या बळावर यश संपादन करावे, असा प्रेरणादायी संदेशही यावेळी देण्यात आला. वेदा दत्तात्रय प्रभाळे हिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल तिचे पालक, शिक्षक, मित्र-मैत्रिणी तसेच ग्रामस्थांनी मनःपूर्वक अभिनंदन केले असून तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

शनिवार दि.०४ जुलै २०२६ | ६

# सत्तर वर्षांची जिर्ण शाळा विद्यार्थ्यांच्या जिवावर बेतणार ?

## गणगेवाडी जि.प. शाळेचे स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन ईमारत उभारण्याची मागणी

बीड। प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील केंद्र बेलगाव अंतर्गत गणगेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत अत्यंत जीर्णावस्थेत पोहोचली असून विद्यार्थी आणि शिक्षक अक्षरशः जीव मुठीत धरून शिक्षण व अध्यापन करत आहेत. सुमारे ७० वर्षांपूर्वी उभारलेल्या या इमारतीच्या भिंतींना मोठमोठे तडे गेले असून पावसाळ्यात वर्गखोल्या गळत असल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे शाळेचे तातडीने स्ट्रक्चरल ऑडिट करून नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी जिल्हा वार्षिक नियोजन समितीच्या निधीतून तरतूद करण्यात यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ (महाराष्ट्र राज्य)चे मुख्य प्रचार प्रमुख डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.








यासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, शिक्षणमंत्री, जिल्हाधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.गणगेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची स्थापना १९५६ साली झाली. सध्या या शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे ११० विद्यार्थी शिक्षण घेत असून ६ शिक्षक कार्यरत आहेत. मात्र, इमारत मोडकळीस आल्याने कोणत्याही क्षणी मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने नवीन इमारतीचा प्रस्ताव मंजूर करून निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता व्यक्त होत आहे.

शाळा सुरू झाल्यापासून अनेक पिढ्यांनी याच इमारतीत शिक्षण घेतले आहे. मात्र, आज हीच इमारत विद्यार्थ्यांच्या जीवाला धोका निर्माण करणारी ठरत असून शासनाने या प्रश्नाकडे तातडीने लक्ष देण्याची गरज असल्याचे डॉ. ढवळे यांनी म्हटले आहे.

### दरवर्षी वरिष्ठांना अहवाल तरीही निर्णय प्रलंबित

गणगेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नवनाथ भोरे यांनी सांगितले की, शाळेची इमारत सुमारे ७० वर्षे जुनी असून भिंतींना मोठ्या प्रमाणात तडे गेले आहेत. शाळेच्या जीर्ण अवस्थेबाबत दरवर्षी वरिष्ठ कार्यालयाला अहवाल सादर करण्यात येतो. मात्र, अद्याप नवीन इमारत किंवा दुरुस्तीबाबत कोणताही ठोस निर्णय झालेला नाही. त्यामुळे शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेची चिंता वाढली आहे.

### आ.धस यांनी तातडीने लक्ष घालावे-डॉ.ढवळे

आष्टी तालुक्यातील गणगेवाडी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची अवस्था अत्यंत धोकादायक झाली असून विद्यार्थ्यांचे भविष्य आणि सुरक्षितता दोन्ही धोक्यात आले आहेत. त्यामुळे नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी आमदार सुरेश आण्णा धस यांनी तातडीने लक्ष घालून शासनस्तरावर पाठपुरावा करावा, अशी मागणी डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या जीवाशी खेळ होण्यापूर्वी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी, असेही त्यांनी नमूद केले आहे.

# अभ्यासासोबतच सामाजिक संस्कारही महत्त्वाचे -डॉ.राजेश इंगोले

अंबाजोगाई । प्रतिनिधी

जोगाईवाडी येथील श्री चैतन्य टेक्नो स्कूलमध्ये डॉक्टर्स डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय संस्थेचे मुख्य विश्वस्त हणमंतराव मोरे हे होते. यावेळी प्राचार्या शैलेजा, संचालक मंडळाचे प्रा.हरीश व संतोष सोनवणे यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी अनेक शालेय विद्यार्थी डॉक्टर वेशभूषा करून कार्यक्रमात सहभागी झाले होते. सूत्रसंचालन श्रीमती पठाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संतोष सोनवणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.




आजच्या स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी अभ्यासक्रम महत्त्वाचा आहेच, परंतु जीवनात यशस्वी माणूस घडण्यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाचा संस्कार शाळेतूनच विद्यार्थ्यांवर व्हायला हवा. आई

◀◀ पान ३ वर

# आठवडी बाजारासह शहरात चोरट्यांचा सुळसुळाट सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची नागरिकांची मागणी

पाटोदा । प्रतिनिधी

शहरात सध्या चोरीच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली असून, विशेषतः गुरुवारी भरणारा आठवडी बाजार चोरट्यांसाठी 'सॉफ्ट टार्गेट' बनला आहे. बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांच्या खिशातून २० हजार रुपयांपर्यंतचे महागडे मोबाईल फोन लंपास केले जात आहेत. एवढेच नव्हे, तर महिलांच्या गळ्यातील मनी-मंगळसूत्रही दिवसाढवळ्या चोरीला जात असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वाढत्या चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी तातडीने शहराच्या मुख्य ठिकाणी आणि विशेषतः आठवडी बाजार परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात यावेत, अशी आग्रही मागणी आता जनतेतून जोर धरू लागली आहे.

बाजारात 'पॉकेटमार' सक्रिय

आठवडी बाजारात ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर नागरिक खरेदीसाठी येतात. याच गर्दीचा फायदा घेत चोरटे अत्यंत सफाईदारपणे हातचलाखी करून मोबाईल आणि दागिने चोरी करत आहेत. एका आठवड्यात अनेक मोबाईल चोरीला गेल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. मात्र, चोरट्यांची ओळख पटवणे कठीण जात असल्याने अनेक नागरिक तक्रार देण्याकडेही दुर्लक्ष करत आहेत.

सीसीटीव्हीची नितांत गरज

शहरातील महत्त्वाच्या चौक आणि सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा नसल्याचा फायदा चोरटे घेत आहेत. जर बाजारात आणि शहरातील प्रमुख प्रवेशद्वारांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले, तर चोरीच्या घटनांवर वचक बसेल आणि गुन्हेगारांची ओळख पटवून त्यांना जेरबंद करणे पोलिसांना सोपे जाईल. सीसीटीव्हीमुळे गुन्हेगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होईल, असा विश्वास नागरिक व्यक्त करत आहेत.

नगरपंचायत

◀◀ पान ३ वर

# जिल्हा वाहतूक शाखेसह परिवहन विभाग आणि रोटरी क्लबची विशेष कार्यशाळा

बीड । प्रतिनिधी

जिल्हा वाहतूक शाखा, बीड आणि परिवहन विभाग, बीड तसेच रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेस तथा रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाऊन यांच्या संयुक्त विद्यमाने शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणार्या स्कूल बस व रिक्षांच्या सुरक्षिततेबाबत विशेष कार्यशाळा व मार्गदर्शन बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर बैठक आज शनिवार दि. ४ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेस, श्री बंकटस्वामी महाविद्यालय, जालना रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे.



या कार्यशाळेत रोटरी सेंटर फॉर रोड सेफ्टी अँड ट्रॅफिक अवेअरनेसचे संचालक प्रो. डॉ. प्रकाश कोंका आणि जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक वैभव पाटील तसेच परिवहन विभाग (आरटीओ)चे वाहतूक रंजित पाटील हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी आवश्यक नियम, स्कूल बस व रिक्षांची सुरक्षा मानके, वाहतूक नियमांचे काटेकोर पालन, वाहनचालकांच्या जबाबदार्या तसेच अपघात प्रतिबंधक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करणार आहेत.

◀◀ पान ३ वर

# विजय कोठुळे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

शहराजवळील चिंचगव्हाण येथील रहिवाशी विजय सदाशिव कोठुळे (वय,३९ वर्ष) यांचे दि ०२ जुलै गुरुवार रोजी सकाळी ५:०० वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.रात्री छातीत तीव्र वेदना होत असल्याने ते स्वतः रात्री १ वाजता संजीवनी हॉस्पिटलमध्ये भरती झाले होते. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून डॉक्टरांनी त्यांना रात्री ३:०० वाजण्याच्या दरम्यान बीड येथे अन्जिओग्राफी करण्यासाठी रेफर केले; परंतु रस्त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या अकस्मात जाण्याने कोठुळे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळा आहे. विजय कोठुळे यांनी अल्पकाळात यशस्वी उद्योजक म्हणून ओळख निर्माण केली होती. दुपारी १:०० वाजता चिंचगव्हाण स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी त्यांनी जोडलेले असंख्य मित्रपरिवार, विविध खात्यातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.त्यांच्या पश्चात आई,पत्नी,एक मुलगा,एक मुलगी, भाऊ,भावजय असा परिवार आहे. चिंचगव्हाणचे माजी सरपंच वसंत उगले यांचे ते मावसभाऊ होत.



# एसआयआर प्रक्रिया सुरू, फॉर्म भरले नाही तर मतदार यादीतून नाव होणार कमी - रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

मतदान यादीत नाव ठेवण्यासाठी सर्व मतदारांनी फॉर्म भरून बीएलओ यांना सहकार्य करावे. असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे शहर मंडळ तालुका अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. . सध्या देशभरत एस आय आर,(स्पेशल इंटेन्सिव्ह रिझर्वेशन) अंतर्गत मतदार यादी विशेष शुद्धीकरण मतदान पुनर्रचना फार्म भरून घेणे चालू आहे त्या अनुषंगाने महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात तालुक्यात एस आय आर फॉर्म भरणे चालू आहे ही मुदत ०१ जुलै ते ३० जुलै अशी असल्यामुळे सर्व मतदारांनी आपला फॉर्म भरून शासकीय बीएलओ व त्यांच्यासोबत असलेले सर्व पक्षांचे सहकारी बी एल ओ यांना देऊन सहकार्य करावे . आपले मतदार यादीत नाव कायम ठेवण्यासाठी फॉर्म भरून नोंदणी करणे गरजेचे आहे नसता आपले मतदार यादीतून नाव वगळण्यात येईल.सध्या बीएलओ प्रत्येक प्रभागांमध्ये फॉर्म भरण्यासाठी जात आहेत त्यामुळे सर्वांनी एक पासपोर्ट फोटो व आधार कार्ड देऊन त्यांना सहकार्य करून फॉर्म भरून घ्यावा तसेच ज्यांची मॅपिंग झालेली आहे त्यांनी कुठलेही कागदपत्रे



◀◀ पान ३ वर

# खांबामधील विद्युत प्रवाहाने बैलाचा मृत्यू सहा जण वाचले, नाथापूर येथील घटना

पिंपळनेर । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील नाथापूर शिवारात पेरणी करत असताना शेतामध्ये उभा केलेल्या खांबामध्ये विद्युत प्रवाह आल्याने एका बैलाचा मृत्यू झाला असून सहा जण बाल बाल वाचल्याची घटना दि. १ जुलै रोजी घडली आहे. दरम्यान सदरील शेतकऱ्याला महावितरणाने नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी होत आहे.

नाथापूर शिवारात कैलास भाऊसाहेब चव्हाण हे आपल्या शेतामध्ये पेरणी करत होते. उशिरा आलेल्या पावसाने जमिनीत ओल झाल्यामुळे या भागात सध्या पेरणीची लगबग सुरू आहे. अशा परिस्थितीत शेतकरी कैलास चव्हाण हे पेरणी करत होते पेरणी करत असताना शेतात महावितरणने उभा केलेल्या पोलमध्ये विद्युत प्रवाह उतरला होता. याची कल्पना नसताना या खांबा जवळून बैल आणि पेरणी करणारे जात असतानाच विद्युत खंबा मधील विद्युत प्रवाहाने बैलाला झटका बसला आणि बैल जागेवरच



◀◀ पान ३ वर

# धारूर मंडळातील बीएलए-२ची एसआयआर संदर्भात बैठक

किल्लेधारूर । प्रतिनिधी

विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (SIR) अभियानाच्या पार्श्वभूमीवर धारूर मंडळातील बीएलए-२ (इङ--२) यांची बैठक घेण्यात आली. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे व खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या सूचनेनुसार आयोजित या बैठकीस माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे बीएलए-१ माधव तात्या निर्मळ उपस्थित होते.

बैठकीत मतदार यादी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण (डखठ) अभियान प्रभावीपणे राबविणे, पात्र मतदारांची नोंदणी, मतदार यादीतील दुरुस्त्या तसेच बूथनिहाय नियोजनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येक बूथवर समन्वयाने काम करण्याचे आवाहन करण्यात आले.बैठकीस लालासाहेब तिडके, गोरख बापू धुमाळ, बालासाहेब चोले, बाळासाहेब गायकवाड, बाळासाहेब खामकर, राजूशेठ कोमटवार, बालाजी चव्हाण, विनायक शिनगारे, प्रदीप नेरकर, बाबा मुंडे, बाळासाहेब सोनटक्के, दादासाहेब घोळवे, ज्ञानोबा बडे, रोहन हजारी, विश्वनाथ तिडके, गणेश बडे, बाळराजे लगड, तुकाराम तिडके, सचिन मैंद, दत्तात्रय मुंडे, बाळासाहेब मुंडे, जगदीश गोरे, शिवाजी राऊत, रंजीत रुपनर, भिसे मामा, केशव रुपनर, हनुमंत गोरे, सतीश तोंडे, गोरख मुंडे, बालाजी नागरगोजे, महेश कोळेकर, महेश पिंगळे, धनंजय नागरगोजे, राधाकृष्ण चोले, बंडू निरडे, रामधन वाव्हळ यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# राजेंद्र मस्के यांचा वाढदिवस उत्साहात साजरा!

## संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सत्कार करून दिल्या शुभेच्छा!

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्रजी मस्के यांच्या वाढदिवसानिमित्त गुरुवारी बीड येथील राशी निवासस्थानी आयोजित अभिष्टचिंतन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विविध सामाजिक, शैक्षणिक, सहकार, व्यापारी व राजकीय क्षेत्रातील मान्यवर तसेच मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांना वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. पुष्पगुच्छ, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. दरम्यान, अंतरवाली सराटी येथे संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी राजेंद्रजी मस्के यांचा प्रेमपूर्वक सत्कार करून वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी व्यक्त झालेला स्नेह, आत्मीयता आणि परस्परांप्रती असलेला आदर हा समाजकारणातील जिव्हाळ्याच्या नात्याचा प्रत्यय देणारा ठरला.

यावेळी भावना व्यक्त करताना राजेंद्रजी मस्के म्हणाले, ''संघर्षयोद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी माझ्यावर व्यक्त केलेले प्रेम, आत्मीयता आणि आशीर्वाद ही माझ्यासाठी प्रेरणादायी ऊर्जा आहे. त्यांच्या या स्नेहाबद्दल मी मनःपूर्वक ऋणी असून त्यांचे हार्दिक आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या प्रेम, विश्वास आणि शुभेच्छांच्या बळावर समाजहित, जनसेवा आणि सर्वसामान्यांच्या न्यायहक्कासाठी अधिक जोमाने कार्य करत राहीन.''

यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजेंद्रजी मस्के यांच्या संघटन कौशल्याचे, समाजाभिमुख कार्याचे तसेच सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने

◀◀ पान ३ वर



# छत्रपती संभाजीनगरमधून अल्पवयीन मुलींची सूटका

**बीड । प्रतिनिधी**

बीडच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने एका गुन्ह्यातील अल्पवयीन पीडित मुलींची सुटका करण्यात यश मिळवले आहे. तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी कर्नाटकपर्यंत धाव घेत, अखेर छत्रपती संभाजीनगरमधून पीडित मुली व आरोपीला ताब्यात घेतले.

पोलीस ठाणे नेकनूर येथे दाखल असलेल्या गुन्हा रजिस्टर नंबर ३४८/२०२५ (कलम १३७(२) बीएनएस २०२३) चा तपास अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडे वर्ग करण्यात आला होता. सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे यांनी या प्रकरणाची सूत्रे हाती घेऊन फिर्यादी व साक्षीदारांची चौकशी केली. सुरुवातीला बीड जिल्ह्यात शोध घेतला असता आरोपी व पीडित मिळून आले नाहीत. तांत्रिक विश्लेषणातून ते कर्नाटक राज्यातील सिद्धी तालुक्यात असल्याचे समजले होते. मात्र, त्यानंतर मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार ते छत्रपती संभाजीनगर येथे आल्याचे स्पष्ट झाले. मिळालेल्या माहितीची खातरजमा करत, एएचटीयू पथक तातडीने २ जुलै रोजी छत्रपती संभाजीनगरला रवाना झाले. तेथील पुंडलिक नगर पोलिसांच्या मदतीने स्थानिक परिसरातील माहितीच्या ठिकाणाहून पीडित मुली आणि आरोपीला ताब्यात घेतले. त्यानंतर पथकाने त्यांना नेकनूर पोलीस ठाण्यात पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी हजर केले. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कावत आणि अपर पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक जनाबाई सांगळे, सहायक पोलीस उप निरीक्षक उषा चौरे, पोलीस हवालदार प्रदीप येवले, अशोक शिंदे आणि पोलीस शिपाई भाऊसाहेब कारले यांचा समावेश होता.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26